# गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर लिंगेश्वर यात्रा उत्साहात

## लाखो भाविकांची उपस्थिती, रात्री १ नंतरही दर्शनासाठी रांगा

**लिंगदेव : (समर्थ गांवकरी)**



हिंदू नववर्षाच्या प्रारंभाचा गुढीपाडवा सण लिंगदेव येथे भगवान श्री लिंगेश्वराच्या पारंपरिक यात्रेद्वारे अत्यंत भक्तिमय व उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. अकोले तालुक्यातील मुळा नदीकाठी वसलेल्या या तीर्थक्षेत्रात महाराष्ट्रासह राज्याबाहेरील लाखो भाविकांनी उपस्थित राहून यात्रेला अभूतपूर्व प्रतिसाद दिला. भगवान लिंगेश्वराच्या दर्शनासाठी सकाळपासूनच भाविकांची मोठी गर्दी उसळली होती. विशेष म्हणजे रात्री उशिरापर्यंत दर्शनासाठी रांग कायम होती. रात्री १ नंतरही हजारो भाविक दर्शनासाठी रांगेत उभे असल्याचे दृश्य पाहायला मिळाले. "हर हर महादेव"च्या जयघोषाने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला. मंदिर व परिसर आकर्षक विद्युत रोषणाईने उजळून निघाला होता, ज्यामुळे संपूर्ण परिसर नयनरम्य दिसत होता. भाविकांनी नवस फेडत नारळ, पेढे, गुळाची शेरणी अर्पण केली. महिला भक्तांनी दंडवत घालत आपली श्रद्धा व्यक्त केली. अश्वनृत्य, बांगड नृत्य, ग्रामप्रदक्षिणा, धार्मिक विधी आणि महाप्रसादामुळे वातावरण अधिकच भारावून गेले. पारंपरिक संगीत आखाडीने यात्रेची शोभा वाढवली. मुख्याध्यापक एकनाथ तुळशीराम फापाळे यांनी सूत्रधार म्हणून प्रभावी सादरीकरण केले. विविध पौराणिक पात्रांच्या अभिनयाला भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

लिंगेश्वर आदर्श विद्यालय, लिंगेश्वर हायस्कूल, आर.आर. कानवडे ज्युनिअर कॉलेज तसेच जिल्हा परिषद प्राथमिक शाळा फापाळेवाडी येथील विद्यार्थ्यांनी लेझीम व विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून यात्रेची रंगत वाढवली.शालेय विद्यार्थ्यांना टोपी व टीशर्टचे वाटप महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ राज्य सरचिटणीस डॉ.विश्वासराव आरोटे व सचिव तथा इमेज हॉलिडेज संचालक हरिभाऊ फापाळे यांच्याकडून देण्यात आले होते. या भव्य यात्रेला अकोले तालुक्याचे आमदार डॉ. किरणजी लहामटे यांची उपस्थिती लाभली. त्यांनी भगवान श्री लिंगेश्वराचे दर्शन घेऊन भाविकांशी संवाद साधला व यात्रेच्या उत्कृष्ट आयोजनाबद्दल देवस्थान ट्रस्ट व ग्रामस्थांचे कौतुक केले. यात्रेतील संगीत आखाडीचे लाईव्ह प्रक्षेपण 'आवाज सह्याद्रीचा', 'अकोले टाईम्स' व 'एमएच मराठी टाइम्स' या यूट्यब चॅनलवर करण्यात आले. त्यामुळे घरबसल्या अनेक भाविकांना यात्रेचा आनंद घेता आला. तसेच मानवत टेलिव्हिजन चॅनलचे प्रतिनिधी उपस्थित राहून यात्रेचे वार्तांकन केले. यात्रेनिमित्त भव्य कुस्ती हंगामा पार पडला. प्रथम पारितोषिक ₹१६,१५१ ठेवण्यात आले होते. रायगड पोलिस आकांक्षा एकनाथ कानवडे यांच्या हस्ते अंतिम कुस्ती लावण्यात आली.

अंतिम लढतीत मनोज एकनाथ चव्हाण (पेमगिरी) यांनी विजय मिळवला त्यांना १६१५१ रुपये रोख रक्कम सन्मान चिन्ह देऊन गौरव करण्यात आला तर अनिल वाघ (शिवडे) यांना ₹४,५५१ देऊन सन्मानित करण्यात आले.

# रुबी हॉल क्लिनिकचा रस्ता सुरक्षा उपक्रमात पुढाकार

**पुणे : (समर्थ गांवकरी)**



रस्ता सुरक्षा आणि आपत्कालीन वैद्यकीय सेवांप्रती आपली बांधिलकी दृढ करत, रुबी हॉल क्लिनिकने ब्रेन इंज्युरी अवेअरनेस मंथ निमित्त "The Road to Rediscovery" या थीम अंतर्गत बाईक रॅलीचे आयोजन केले. यासोबतच, अपघातग्रस्तांना 'गोल्डन अवर'मध्ये जलद आणि समन्वयित उपचार देण्यासाठी कोड गोल्ड (पॉलीट्रॉमा कोड) या विशेष प्रोटोकॉलचीही सुरुवात करण्यात आली. या कार्यक्रमाला डॉ.पर्वेझ ग्रांट, मुख्य हृदयरोगतज्ज्ञ, चेअरमन आणि मॅनेजिंग ट्रस्टी, रुबी हॉल क्लिनिक; डॉ. सायमन ग्रांट, फिजिशियन आणि ट्रस्टी; सौ.नॅटली ग्रांट नंदा; डॉ. आशिष नंदी; श्री. उर्वक्ष भोटे; डॉ. विवेक लाल; तसेच मेजर रंजना विल्यम्स यांची उपस्थिती लाभली. मिशन सेफर रोड्स बायकर ग्रुपच्या सहकार्याने आयोजित या रॅलीत बायकर, आरोग्यसेवा व्यावसायिक आणि नागरिकांनी सहभाग घेत सुरक्षित वाहनचालना, विशेषतः हेल्मेट वापराबाबत जागरूकता निर्माण केली. पुण्यात रस्ते अपघातांची संख्या अजूनही चिंताजनक आहे, जी देशव्यापी स्थितीचे प्रतिबिंब आहे. शहराच्या वाहतूक विभागाच्या आकडेवारीनुसार, २०२५ मध्ये पुण्यात १,३०० हून अधिक अपघात नोंदवले गेले, ज्यात सुमारे ३०० जणांचा मृत्यू झाला. तर २०२४ मध्ये १,४०४ अपघात आणि ३२० मृत्यू नोंदवले गेले. दुचाकीस्वार आणि पादचारी हे सर्वाधिक असुरक्षित असून, एकूण मृत्यूंपैकी सुमारे ९०% त्यांच्यात आहेत. मृत्यूंच्या संख्येत किंचित घट झाली असली तरी गंभीर जखमींचे प्रमाण वाढत आहे, यामुळे प्रतिबंधात्मक जागरूकता आणि 'गोल्डन अवर'मध्ये त्वरित उपचारांची गरज अधोरेखित होते. डॉ.पर्वेझ ग्रांट म्हणाले, "रस्ता सुरक्षा ही केवळ धोरणात्मक बाब नाही, तर ती सर्वांची सामूहिक सामाजिक जबाबदारी आहे. अशा उपक्रमांद्वारे आणि 'कोड गोल्ड'सारख्या प्रणालीमुळे आम्ही जागरूकता वाढवण्यासोबतच आपत्कालीन तयारीही मजबूत करत आहोत. 'गोल्डन अवर'मध्ये उपचार मिळाल्यास जीव वाचवता येतो आणि अशा संरचित प्रणाली यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावतात."

# अपघातग्रस्त ऋत्विकला समाजाचा आधार विविध स्तरांतून मदतीचा हात



**जुन्नर तालुका : (समर्थ गांवकरी)**

धनगरवाडी ता:-जुन्नर येथील ढोबळे कुटुंबातील ऋत्विक अनिल ढोबळे याला सामाजिक संस्थांकडून मदतीचा हात देण्यात आला आहे.दोन महिन्यांपूर्वी झालेल्या अपघाता मध्ये ऋत्विकला एक पाय गमवावा लागला असून त्याचे कुटुंब अत्यंत गरिबीत जीवन जगत आहे. मोलमजुरी करून उदरनिर्वाह करणाऱ्या कुटुंबाला तातडीच्या मदतीची गरज होती.

अश्विनी पिंगळे यांनी ही माहिती डिसेंट फाउंडेशन पर्यंत पोहोचवल्यानंतर संस्थेकडून तत्काळ मदत करण्यात आली. फाउंडेशनतर्फे ऋत्विकला व्हीलचेअर व पाच हजार रुपये रोख देण्यात आले.तसेच संस्थेचे सदस्य डॉ.अमेय डोके यांच्या माध्यमातून त्याला पौष्टिक आहाराची सोय करण्यात आली आहे.पुढील एका महिन्यात कुटुंबासाठी शौचालय बांधून देण्याचेही त्यांनी जाहीर केले.

याशिवाय, ओतूर येथील दहावी'क'च्या माजी विद्यार्थ्यांनी तीन ते चार महिने पुरेल एवढा किराणा उपलब्ध करून दिला. गावातील ग्रामस्थांनी एकत्र येत सुमारे ७५ हजार रुपये रोख रक्कम जमा केली असून तीही या कुटुंबाला देण्यात येणार आहे.

या प्रसंगी जितेंद्र बिडवई यांनी समाजाला आवाहन करताना सांगितले की,"अशा कठीण प्रसंगी जात,पात,धर्म किंवा प्रांत न पाहता समाजाने एकत्र येऊन गरजूंच्या पाठीशी उभे राहिले पाहिजे."या मदतकार्यावेळी डिसेंट फाउंडेशनचे संस्थापक जितेंद्र बिडवई, सचिव डॉ.एफ. बी. आतार,संचालक आदिनाथ चव्हाण यांच्यासह बाळासाहेब खिलारी,महेंद्र खिलारी,गणेश मेहेर,शिरीष डुंबरे,प्रीतम डुंबरे, निलेश महाले,संजय गायकर, इंद्रजित शेळके,मयूर शेळके, प्रवीण शेळके,मंगेश शेळके, हनुमंत शेळके,रवींद्र शेळके आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आग लागून लाखो रुपयांचे नुकसान

**तामसा : (समर्थ गांवकरी)**

तामसा येथील शेतकरी ॲग्रो फार्म नांदेड रोड येथे सकाळी नऊ वाजता शॉर्टसर्किट झाल्यामुळे तारा खाली ठेवलेल्या लाखो रुपयाचे कापूस जळून खाक झाले. दिनांक 20 रोजी सकाळी नऊ वाजता नांदेड रोड स्थित शेतकरी ॲग्रो फार्म येथे वानराचे उपद्रवामुळे वायर तुटून कापसाच्या गंजीला पेट धरल्याने आग लागल्याची घटना होऊन लाखो रुपयाची कापूस जळून खाक झाले. घटनेची माहिती मिळताच तामसा पोलीस ठाण्याचे सपोनि सहदेव खेडकर यांनी भ्रमणध्वनी द्वारे भोकर येथील अग्निशामक दल घटनेची माहिती दिली माहिती मिळताच अग्निशामक दलाचे फायर अधिकारी त्रिरत्न कावळे व त्यांचे सहकारी बालाजी कल्याणकर, संदीप श्रीरामवार यांनी वेळेवर येऊन आज विजण्यासाठी परिश्रम घेतले.

# अर्धापूरात पटेल यांनी फेटे बांधून आगळी वेगळी रमजान ईद केली साजरी

**अर्धापूर : (समर्थ गांवकरी)**



माजी पोलीस पाटील मुमताज पटेल कुटुंबियाकडून गेल्या अनेक वर्षांपासून सुरू असलेली परंपरा याही वर्षी दि २१ शनिवारी रोजी सर्व समाजातील घटकांना सोबत घेऊन ईद-उल-फित्र अर्थात रमजान ईद निमित्त आदर करीत सर्वांना फेटे बांधून शुरकुंब्याची मेजवानी देऊन उत्साहात रमजान ईद साजरी करण्यात आली. सर्व पक्षीय राजकारणी मंडळी, प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी, शेतकरी, सामाजिक कार्यकर्ते यांच्यासह अनेकांना बोलावून त्यांचे आदरातिथ्य करुन आलेल्या सर्व पाहुण्यांना फेटा बांधून त्यांचा सन्मान करण्यात आला. मागील एक्कोनतिस वर्षांपासून ही अखंडीत परंपरा पटेल कुटुंबियांनी सुरु ठेवलीय. यातून अर्धापूरचे माजी पोलीस पाटील मुमताज पटेल यांनी समाजाला एकोप्याचा संदेश देऊन सामाजिक बांधिलकी जोपासलीय..

या कार्यक्रमास जेष्ठ नेते धर्मराज देशमुख,भाजप नांदेड जिल्हाध्यक्ष ॲड किशोर देशमुख, नांदेड कृऊबाचे सभापती संजय देशमुख लहानकर, शिवसेना जिल्हाप्रमुख बबन बारसे,नगराध्यक्ष प्रतिनिधी प्रवीण देशमुख,माजी नगराध्यक्ष छत्रपती कानोडे, संचालक निळकंठ मदने,किसान मोर्चाचे जिल्हाध्यक्ष सुधाकर कदम,जिल्हा उपाध्यक्ष ओमप्रकाश पत्रे, तालुकाध्यक्ष सखाराम क्षीरसागर उपसभापती अशोक कपाटे,तालुकाध्यक्ष सुनिल वानखेडे, राष्ट्रवादीचे उद्धव राजेगोरे, युवानेते विराज देशमुख, जेष्ठ पत्रकार लक्ष्मीकांत मुळे, तालुकाध्यक्ष गुणवंत विरकर,उदयकुमार गुंजकर, संजय जतकर, अशोक डांगे,गटनेते बाबुराव लंगडे,रमेश क्षीरसागर,तालुकाध्यक्ष बालाजी गव्हाणे,माजी उपनगराध्यक्ष राजेश्वर शेटे, पोलीस निरीक्षक चंद्रशेखर कदम,आर.आर.देशमुख , व्यंकट साखरे, नगरसेवक सोनाजी सरोदे, सचिव लंगडे ,डॉ विशाल लंगडे , किशोर शहाणे,व्यंकटी राऊत,नामदेव सरोदे,नगरसेवक गाजी काजी,उमाकांत सरोदे, तालुकाध्यक्ष उध्दव सरोदे, पंडित शेटे,गोपाल पंडित,शेख सादेक यांच्यासह सर्व क्षेत्रातील मान्यवर आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांना सुरेख महाराष्ट्रीय फेटे मनोज पतंगे यांनी बांधले . कार्यक्रम यशस्वीतेसाठी शेख मोहसीन ,शेख परवेझ,ऐरार अलीखान,शेख सादेक यांच्या सह मुमताज पटेल मित्र मंडळासह अनेकांनी परीश्रम घेतले आहेत. रमजान ईद निमित्त माजी नगराध्यक्ष नासेरखान पठाण,उपनगराध्यक्ष मुक्तेदर खान पठाण, नगरसेवक शेख जाकीर,माजी उपनगराध्यक्ष मुसबीर खतीब,नगरसेवक गाजी काजी, जेष्ठ नेते शेख मुनीर शेख हैदर तांबोळी, माजी तालुकाध्यक्ष फिरदोस हुसेनी, आदींसह अनेक मुस्लिम बांधवांकडे भेट घेऊन शुभेच्छा दिल्या.

# ज्ञानेश्वर माऊलींना नांदेडकरांची मनोभावे मानवंदना

- सांस्कृतिक कार्य विभागाच्या "मोगरा फुलला" या कार्यक्रमास नांदेडकरांचा उदंड प्रतिसाद - सभागृह केले हाऊसफुल

**नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)**



संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊली यांच्या ७५० व्या जयंती वर्षानिमित्त महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभाग व सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या वतीने प्रख्यात प्रभोधनकार गणेश शिंदे यांच्या सुश्राव्य वाणीतून "ज्ञानियांचा राजा – मोगरा फुलला" या विशेष आध्यात्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन दि. १८ मार्च रोजी कुसुम सभागृह येथे करण्यात आले होते.

या कार्यक्रमास नांदेडकरांचा प्रचंड असा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या कार्यक्रमात भक्तिमय वातावरणाची अनुभूती उपस्थितांना मिळाली. या कार्यक्रमासाठी उदघाटक म्हणून लाभलेल्या नांदेड चे जिल्हाधिकारी राहुल कर्डीले यांच्या हस्ते दीपप्रज्वलन व संत ज्ञानेश्वर माऊली यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. संत ज्ञानेश्वर माऊली यांनी भावार्थदीपिका (ज्ञानेश्वरी) या महान ग्रंथाद्वारे अध्यात्म, समता, प्रेमभाव आणि मानवतेचा संदेश सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचवला. त्यांच्या विचारांनी महाराष्ट्रातील वारी परंपरा, संत साहित्य आणि समाजातील ऐक्यभाव अधिक दृढ केला आहे हे प्रभोधनकार गणेश शिंदे यांनी प्रभाविपणे मांडले.

यानंतर अभंग, प्रवचन तसेच सांस्कृतिक सादरीकरणांद्वारे संत ज्ञानेश्वरांच्या जीवनकार्याचा व विचारांचा वेध घेण्यात आला. "मोगरा फुलला" या संकल्पनेतून अध्यात्म, भक्ती आणि संस्कृती यांचा सुंदर संगम साकारण्यात आला. या प्रसंगी मान्यवरांच्या उपस्थितीत संत परंपरेचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. संत ज्ञानेश्वरांनी दिलेला समानता, मानवता आणि अध्यात्माचा संदेश आजही तितकाच प्रेरणादायी असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.

कार्यक्रमात विविध कलाकारांनी सादर केलेल्या अभंग व भजनांनी रसिकांना मंत्रमुग्ध केले.

या कार्यक्रमात रसिक नंतर एवढे मंत्रामुग्ध झाले कि रसिकांना अनेक दर्जेदार अभंग सादर करणाऱ्या गायिका सन्मित्रा शिंदे यांच्या अभंगावर रसिकांनी ठेका धरत ज्ञानेश्वर माऊली च्या जायघोषणे संपूर्ण सभागृह भक्तीमय केले. सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या वतीने आयोजित हा कार्यक्रम महाराष्ट्राचे सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांच्या यांच्या संकल्पनेतून व तसेच सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी व संचालक श्रीराम पांडे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला होता.

सूंदर सादरीकरण, प्रभावी रंगमंच व्यवस्था, सभागृह परिसरात अध्यात्मिक वातावरण निर्मिती व अचूक नियोजनाच्या या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभाग व सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे नांदेड मध्ये अध्यात्मिक वर्ग, संगीत व सांस्कृतिक क्षेत्रात कार्य करणारे कलावंत, तरुण वर्ग व इतर सर्वच स्तरांतून कौतुक होत आहे.

# मोटासायकल स्वाराचा मृत्यू

**नांदेड : (समर्थ गांवकरी)**

नांदेड ग्रामीण पोलीस ठाणे हद्दीतील वाजेगाव बंधाऱ्याजवळ आज सकाळी झालेल्या मोटासायकलच्या स्फोटात जखमी झालेल्या व्यक्तीचा जागीच मृत्यू झाला असल्याची माहिती अप्पर पोलीस अधीक्षक सुरज गुरव यांनी माध्यमांशी बोलताना दिली .या स्फोटातील मयताची अद्याप ओळख पटली नसल्याचेही त्यांनी माध्यमांना सांगितले. या घटनेचा सखोल तपास केला जात असल्याचेही गुरव यांनी सांगितले असून घटनास्थळी काही संशयास्पद वस्तू आढळल्याने या घटनेची तिव्रता वाढली असल्याचे दिसत आहे नवीन नांदेडमधील वाजेगाव बंधाऱ्याजवळ शनिवारी सकाळी ९ ३० वाजता च्या दरम्यान एक व्यक्ती दुचाकीच्या स्फोटात गंभीर जखमी झाला होता. त्याला रुग्णालयात दाखल करण्यात आली असल्याची माहिती नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोळकर यांनी एका व्हिडिओ संदेशाव्दारे दिली होती.

# नॉगवतीकडून 'आवेग प्रो' प्लॅटफॉर्मचे पुण्यात लोकार्पण

**पुणे : (समर्थ गांवकरी)**



भारतातील आघाडीची फ्युएल-टेक स्टार्टअप 'नॉगवती'ने पेट्रोल पंप चालकांसाठी विकसित केलेला 'आवेग प्रो' हा सर्वसमावेशक डिजिटल प्लॅटफॉर्म पुण्यात आयोजित पेट्रोल डीलर्स असोसिएशन पुणे (PDAP) च्या वार्षिक सर्वसाधारण सभेत (AGM 2026) लॉन्च केला.

'आवेग प्रो' हा प्लॅटफॉर्म पेट्रोल पंपांच्या दैनंदिन कामकाजाचे डिजिटायझेशन करून विक्री ट्रॅकिंग, स्टॉक मॅनेजमेंट, फ्लीट क्रेडिट आणि अकाउंटिंग प्रक्रिया सुलभ करण्यासाठी तयार करण्यात आला आहे. भारतातील इंधन रिटेल क्षेत्रातील गुंतागुंती लक्षात घेऊन हा प्लॅटफॉर्म एकाच डिजिटल प्रणालीत विविध कार्ये एकत्रित करतो.

या प्लॅटफॉर्ममुळे मॅन्युअल सेल्स रीकन्सिलिएशन, स्टॉक व्हेरिएशन ट्रॅकिंग, फ्लीट इनव्हॉइसिंग आणि कॅश पेमेंटमधील तफावत यांसारख्या समस्या कमी होण्यास मदत होणार आहे. तसेच, लाईव्ह इन्व्हेंटरी ट्रॅकिंग, डिजिटल करार, क्रेडिट मॉनिटरिंग आणि रिअल-टाइम बॅलन्स शीट व्हिजिबिलिटी यांसारख्या सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

नॉगवतीचे सह-संस्थापक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी वैभव कौशिक यांनी सांगितले की, "आवेग प्रोच्या माध्यमातून पेट्रोल पंप चालकांच्या प्रत्यक्ष कामकाजातील अडचणी सोडवण्याचा आमचा प्रयत्न आहे. या प्लॅटफॉर्ममुळे त्यांना अधिक पारदर्शकता, नियंत्रण आणि कार्यक्षमतेसह काम करता येईल."

तसेच, सह-संस्थापक आलाप नायर यांनी सांगितले की, "हा प्लॅटफॉर्म भारतातील फ्युएल रिटेल ऑपरेशन्सच्या दैनंदिन गरजांनुसार तयार करण्यात आला आहे. मॅन्युअल प्रक्रियांपासून दूर जाऊन अधिक स्मार्ट पद्धतीने व्यवसाय करण्यास तो मदत करेल."

'आवेग प्रो' हा प्लॅटफॉर्म अकाउंटिंग, इन्व्हेंटरी, विक्री, ग्राहक व्यवस्थापन आणि इनव्हॉइसिंग या सर्व सेवा एकाच ठिकाणी उपलब्ध करून देतो. तसेच, CCTV, डिस्पेंसर, स्टोरेज सिस्टीम आणि व्हेईकल ट्रॅकिंग यांसारख्या विद्यमान यंत्रणांशी सुसंगत राहून रिअल-टाइम ऑपरेशनल मॉनिटरिंगची सुविधा देखील देतो. नॉगवती ही भारतातील पहिली फ्युएल-टेक कंपनी असून, ती पेट्रोल पंप ऑपरेशन्स आधुनिक करण्यासाठी तंत्रज्ञानाधारित उपाय उपलब्ध करून देत आहे. कंपनीने आता UAE आणि श्रीलंका या देशांमध्येही विस्तार सुरू केला आहे

# स्पार्क फाउंडेशनने दिला विद्यार्थ्यांना सहलीचा अनुभव



**पालघर : (समर्थ गांवकरी)**

शिक्षण म्हणजे फक्त पुस्तकी ज्ञान नाही तर जे चार भिंतीत शिक्षण मिळत त्याला जर प्रत्यक्ष अनुभवाची जोड मिळाली तर विद्यार्थ्यांच्या कायम स्वरूपी लक्षात राहते. म्हणून शैक्षणिक सहली किंवा अभ्यास दौऱ्याची गरज असते. अशीच ऐतिहासिक, धार्मिक आणि वैज्ञानिक अशी त्रिवेनी अनुभती देणारी सहल स्पार्क फाउंडेशन ठाणे यांच्या सहकार्यतून जिल्ह्या परिषद iso शाळा कोचाळे शाळेच्या मुलानी अनुभवली जिल्हा परिषद शाळा कोचाळे शाळेचे पाचवी ते आठवी चे चाळीस विद्यार्थी चार शीक्षक, आणि आठ पालक व शाळा व्यवस्थापण समिती सदस्य सहलीत सहभागी झाले होते यां एक दिवसिय सहलीत मुलानी प्रसिद्ध असेल नाशिकचे जैन मंदिर बघितले यात मंदिरात असलेलेभगवान महाविर यांची कोरीव मूर्ती तसेच गोशाळा , पांडव लेणी मधील पुरातन काळातील शिला लेख, भगवान गौतम बुद्ध यांची दगडा वर कोरलेल्या विविध मूर्त्या, यात असलेल्या गुफा , नेहरू तारागनातील शो ज्यांमध्ये संपूर्ण सूर्यमाला, ग्रह तारे निर्मिती आणि उपग्रह यांचा प्रत्यक्षात अनुभव घेतला.

# जामखेड तालुक्यात रमजान ईद उत्साहात साजरी

**जामखेड : (समर्थ गांवकरी)**



जामखेड - जामखेड शहरासह तालुक्यातील खर्डा, अरणगाव, जवळा, नान्नज, धनेगाव आणि पिंपरखेड येथे रमजान ईद मोठ्या उत्साहात आणि शांततेच्या वातावरणात साजरी करण्यात आली. विविध ठिकाणी ईदगाह मैदानावर मुस्लिम बांधवांनी एकत्र येत सामुहिक नमाज अदा केली आणि सर्वांसाठी सुख-शांतीची प्रार्थना केली. शनिवार सकाळी नऊ वाजता झालेल्या मुख्य नमाज पठणाला हजारोंच्या संख्येने मुस्लिम समाज बांधव उपस्थित होते. सर्व मुस्लीम बांधवांना मौलाना मुफ्ती अब्दुल आ लीम पठाण यांनी नमाजाचे पठन केले. या पवित्र प्रसंगी त्यांनी विश्वशांती, बंधुता आणि माणुसकीसाठी प्रार्थना केली.

समाजात संवाद वाढावा, प्रेम आणि सेवाभाव बळकट व्हावा, यासाठी मौलाना मुक्ती अब्दुल आलीम पठाण यांनी नमाज अदा करून अल्लाहकडे प्रार्थना केली. नमाज पठणानंतर ईदच्या शुभेच्छा देण्यासाठी पोलिस निरीक्षक दशरथ चौधरी, भाजपाचे ज्येष्ठ नेते प्रा. मधुकर राळेभात, मुस्लिम पंच कमिटी अध्यक्ष अझरभाई काझी, उपनगरध्यक्ष पोपट राळेभात, माजी नगरसेवक अमित चिंतामणी, प्रा. संजय वराट,मोहन पवार, प्राचार्य विकी घायतडक, शिवसेना शिंदे गटाचे तालुकाध्यक्ष प्रा.कैलास माने, शिवसेना नेते आकाश बाफना, सामाजिक कार्यकर्ते अवधुत पवार, प्रा. लक्ष्मण ढेपे,वंचित बहुजन आघाडीचे राज्य प्रवक्ते अरुण जाधव,भाजप शहराध्यक्ष पवन राळेभात,काँग्रेसचे राहुल उगले, सुरेश जाधव,शिवकुमार डोंगरे, अमोल गिरमे,वसीम सय्यद, संदीप गायकवाड, राजू गोरे ,शहाजी राळेभात, प्रशांत राळेभात, प्रदीप टापरे, शेरखान पठाण, शमा हाजी कादर, एजाज पठाण, वाजीद पठाण, वैजनाथ पोले, प्रा. कैलास हजारे, सुनील जावळे, हरीभाऊ आजबे, शिवकुमार डोंगरे, गफ्फारभाई सय्यद, मंजुरभाई सय्यद, हाबीब मास्टर, उमर कुरेशी, हाजी जावेद सय्यद, वसीम कुरेशी, मुक्तार सय्यद, जमीर सय्यद, ईस्माइल सय्यद, काँग्रेसचे राहुल उगले, वसीम सय्यद, आबेद खान, जुबेर भाई शेख आदी उपस्थित होते. रमजान महिना संयम,भक्ती आणि परोपकाराचा संदेश देणारा मानला जातो. यानिमित्ताने मुफ्ती अब्दुल आलीम पठाण यांनी जगातील शांततेसाठी आणि भारतातील सामाजिक ऐक्य टिकवण्यासाठी विशेष प्रार्थना केली. त्यांनी सर्वधर्मीयांनी परस्पर सहकार्य आणि सामंजस्याने पुढे जाण्याचे आवाहन करून राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश दिला. सामाजिक, राजकीय, पत्रकार आणि प्रशासनिक क्षेत्रातील व सर्व जाती धर्मातील नागरिकांनी मुस्लिम समाज बांधवांना अलिंगन देऊन ईदच्या हार्दिक शुभेच्छा दिल्या. ईदगाह मैदानावर राष्ट्रीय एकात्मतेचे दर्शन घडवले. खर्डा चौक, जयहिंद चौक, मशिदी व दर्गाहमध्ये अनुचित प्रकार घडू नये, यासाठी पोलिस निरीक्षक दशरथ चौधरी यांच्या नेतृत्वाखाली पोलीसांनी चोख बंदोबस्त ठेवला होता. मुस्लीम पंच कमिटीचे अध्यक्ष अझहर काझी यांनी सर्व पक्षीय कार्यकर्ते इदगाह मैदानावर येऊन मुस्लीम बांधवांना शुभेच्छा देतात . व राष्ट्रीय सलोखा राखतात त्याबद्दल त्यांनी सर्वांचे आभार मानले.

## अजहर काझी यांच्याकडून शीरखुर्मा पार्टी

अझहर काझी यांच्या शीरखुर्मा पार्टीत सामाजिक,राजकीय, शैक्षणिक, प्रशासकीय,व्यापारी, कृषी, पत्रकार मंडळी हजर होते. यानिमित्ताने सर्व जाती-धर्मांमध्ये जातीय सलोखा रहावा. सर्व जण सुख शांतीने नांदावेत अशा प्रकारची प्रार्थना करण्यात आली. शीरखुर्मा पार्टीत गुलगुले, भज्याचा सर्वांनी मनमुरादपणे आस्वाद घेतला.

# अंकिता पाटील ठाकरे यांचेकडून गारपिटीमुळे नुकसानग्रस्त फळबागा, पिकांची पाहणी - शेतकऱ्यांशी साधला संवाद

इंदापूर : (समर्थ गांवकरी)

बावडा (ता. इंदापूर) व परिसरामध्ये गारपिटीमुळे नुकसान झालेल्या फळबागा, शेती पिकांची पुणे जिल्हा परिषदेच्या सदस्या अंकिता पाटील ठाकरे यांनी शनिवारी (दि. 21) पाहणी करून शेतकऱ्यांची संवाद साधला व त्यांना दिलासा दिला.



इंदापूर तालुका व परिसरात वादळी वारे व विजेच्या कडकडाटासह गुरुवारी दि. 19 सायंकाळी सुमारे अर्धा तास अवकाळी पावसासह बावडा परिसरात जोरदार गारपीट झाली. या गारपिटीमुळे शेतातील काढणी चालु असलेल्या गहू, हरभरा आदी रब्बी हंगामातील पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. तसेच डाळिंब, द्राक्ष, पेरू, केळी आदी फळबागांनाही या गारपिटीचा फटका बसला आहे. तसेच डाळिंब, पेरू फळबागा सध्या फुलोऱ्याच्या अवस्थेत असून, गारपिटीमुळे फळबागांमध्ये फुलगळ मोठ्या प्रमाणावरती हानी झाली आहे. त्याचबरोबर काढणीच्या अवस्थेत असलेल्या द्राक्ष बागांमध्ये द्राक्षांना तडे जाऊन मोठ्या प्रमाणावरती मणी गळून पडले आहेत. शिवाय कडवळ, मकवान आदी चारा पिकांचेही वादळी वाऱ्याने जमिनीवर लोळल्याने नुकसान झाल्याचे अंकिता पाटील ठाकरे यांनी सांगितले. बावडा परिसरामध्ये ठिकठिकाणी या नुकसानग्रस्त फळबागा, शेती पिकांना अंकिता पाटील ठाकरे यांनी भेट दिली.

या पाहणीनंतर गारपिटीमुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाल्याचे अंकिता पाटील ठाकरे यांनी सांगितले. इंदापूर तालुका व परिसरातील नुकसानग्रस्त फळबागा व शेती पिकांचे शासनाने तातडीने पंचनामे पूर्ण करून शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळणे बाबत कृषिमंत्री दत्तात्रय भरणे, माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांचेकडे पाठपुरावा करणार असल्याचे अंकिता पाटील ठाकरे* यांनी सांगितले.

यावेळी इंदापूर पंचायत समिती सदस्या धनश्री पाटील, सरपंच पल्लवी गिरमे, उपसरपंच रणजीत घोगरे, ग्रामविकास अधिकारी अंबिका पावसे, पदाधिकारी उपस्थित होते.

# पर्यावरण संरक्षण प्रत्येकाची जबाबदारी : रविंद्र भोर




जुन्नर तालुका : (समर्थ गांवकरी)

पर्यावरणाचा ऱ्हास दिवसेंदिवस वाढत आहे त्याचे विपरीत परिणाम मानव,पशु पक्षी,प्राणी आणि वनस्पती यांच्यावर होत असून पर्यावरणा चे संरक्षण करण्याची जबाबदारी आपण सर्वांचीच आहे असे प्रतिपादन चाईल्ड फंड इंडिया संस्थेचे व या प्रकल्पाचे ब्रँड अँबीसिडर रविंद्र भोर यांनी दहा शाळांमध्ये ग्रीन कमिटीची स्थापना करताना केले. क्लायमेट चेंजविरोधात महत्त्वपूर्ण पाऊल चाईल्ड फंड इंडिया यांच्या "इंडिया बिल्डिंग सस्टेनेबल क्लायमेट चेंज" प्रकल्पांतर्गत दहा शाळांमध्ये ग्रीन कमिटीची यशस्वी स्थापना करण्यात आली आहे.प्रत्येक शाळेमध्ये १५ ते २० सदस्यांचा सहभाग ठेवून या कमिट्या स्थापन करण्यात आल्या आहेत. या सर्व ग्रीन स्कुल कमिट्यांची स्थापना व मार्गदर्शन प्रकल्पाचे ॲम्बेसिडर रविंद्र भोर व मिथुन मोजाड यांनी केले.यावेळी ग्रीन कमिटीचा उद्देश,कार्यपद्धती, महत्व तसेच पर्यावरण संवर्धना साठी राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले व या कमिट्यांमध्ये गावातील सरपंच, उपसरपंच,पोलीस पाटील शिक्षक,विद्यार्थी,अंगणवाडी सेविका,युवक व प्रभावी नागरिकांचा सक्रिय सहभाग नोंदविण्यात आला.या उपक्रमामुळे शाळा व गाव पातळीवर पर्यावरणाबाबत जागरूकता वाढण्यास मदत होऊन शाश्वत विकासाच्या दिशेने एक सकारात्मक आणि प्रभावी पाऊल उचलले जात आहे.

# ग्लेनमार्ककडून GLIPIQ® (सेमाग्लूटाइड) भारतात लाँच

*टाइप-२ डायबिटीजसाठी परवडणारी GLP-1 थेरपी; साप्ताहिक खर्च ३२५ पासून*

Glenmark
A new way for a new world

**काय आहे सेमाग्लूटाइड?**

सेमाग्लूटाइड हे GLP-1 रिसेप्टर ॲगोनिस्ट असून, रक्तातील साखर नियंत्रणासोबतच स्थूलता, हृदयविकार आणि मूत्रपिंडाच्या आजारांमध्येही फायदेशीर मानले जाते.

मुंबई : (समर्थ गांवकरी)

ग्लेनमार्क फार्मास्युटिकल्स लिमिटेडने भारतात GLIPIQ® (सेमाग्लूटाइड) हे नवे औषध लाँच केले आहे. टाइप-२ डायबिटीजच्या व्यवस्थापनासाठी वापरल्या जाणाऱ्या GLP-1 थेरपीला परवडणाऱ्या किमतीत उपलब्ध करून देणे हा या लॉन्चमागील प्रमुख उद्देश आहे. या औषधामुळे प्रगत इंजेक्शन थेरपीचा खर्च कमी होऊन अधिक रुग्णांना उपचार लवकर सुरू करण्याची संधी मिळणार आहे. GLIPIQ® चे साप्ताहिक उपचार खर्च ₹325 ते ₹440 दरम्यान असल्याने, या वर्गातील उपचार अधिक सुलभ आणि किफायतशीर ठरणार आहेत. GLIPIQ® हे वायल आणि प्री-फिल्ड पेन या दोन्ही स्वरूपात उपलब्ध आहे. वायल-आधारित फॉर्म्युलेशनमुळे डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली लवचिक डोसिंग शक्य होते, तर प्री-फिल्ड पेनमुळे रुग्णांना दीर्घकालीन उपचारासाठी स्वयं-डोसिंगची सुविधा मिळते. या औषधाला भारतातील बहु-केंद्रित फेज-३ क्लिनिकल ट्रायल्सनंतर CDSCO ची मान्यता मिळाली आहे. या अभ्यासांमध्ये भारतीय रुग्णांमध्ये औषधाची प्रभावीता आणि सुरक्षितता समाधानकारक असल्याचे दिसून आले आहे. ग्लेनमार्कने 'संकल्प' हा रुग्ण समर्थन कार्यक्रमही सुरू केला आहे. या माध्यमातून रुग्णांना उपचार सुरू करण्यासाठी मार्गदर्शन, इंजेक्शन थेरपीबाबत आत्मविश्वास आणि दीर्घकालीन पालनासाठी मदत केली जाणार आहे. ग्लेनमार्कचे अध्यक्ष (इंडिया फॉर्म्युलेशन्स) आलोक मलिक यांनी सांगितले, "डायबिटीजच्या प्रगत उपचारांमध्ये खर्च हा मोठा अडथळा ठरतो. GLIPIQ® द्वारे आम्ही परवडणाऱ्या किमतीत GLP-1 थेरपी उपलब्ध करून देत आहोत, ज्यामुळे अधिकाधिक रुग्णांना या उपचाराचा लाभ मिळेल."

# येत्या रविवारी वृत्तपत्र विक्रेत्यांची निसर्ग सहल

नांदेड : (समर्थ गांवकरी)

रोजच्या धावपळीतून विरंगुळा मिळावा आणि निसर्गाच्या सानिध्यात घटकाभर आनंद लुटता यावा, यासाठी महाराष्ट्र राज्य वृत्तपत्र विक्रेता संघटनेचे कार्याध्यक्ष बालाजी पवार यांच्या संकल्पनेतून नांदेड जिल्हा वृत्तपत्र वितरक विकास मंडळाच्या वतीने रविवार दि. 22 मार्च रोजी 'निसर्ग सहली'चे आयोजन करण्यात आले आहे. वृत्तपत्र विक्रेता निसर्ग सहलीचे हे 2 रे वर्षे आहे. दररोज पहाटेपासून ते उशिरापर्यंत नागरिकांच्या दारापर्यंत बातम्या द्वारे जगाची माहिती पोहोचवण्याचे काम करणाऱ्या "माहिती दूत" या कष्टकरी घटकाला एकत्र आणने व त्यांच्या परिवारां सोबत "एक दिवस आनंदासाठी" हा या सहली मागचा मुख्य उद्देश आहे.

# ईदगाह मैदानावर राष्ट्रीय एकात्मतेचे दर्शन

- जामखेड तालुक्यात रमजान ईद उत्साहात साजरी
- विश्वशांतीसाठी केली प्रार्थना

जामखेड : (समर्थ गांवकरी)

जामखेड - जामखेड शहरासह तालुक्यातील खर्डा, अरणगाव, जवळा, नान्नज, धनेगाव आणि पिंपरखेड येथे रमजान ईद मोठ्या उत्साहात आणि शांततेच्या वातावरणात साजरी करण्यात आली. विविध ठिकाणी ईदगाह मैदानावर मुस्लिम बांधवांनी एकत्र येत सामुहिक नमाज अदा केली आणि सर्वांसाठी सुख-शांतीची प्रार्थना केली. शनिवार सकाळी नऊ वाजता झालेल्या मुख्य नमाज पठणाला हजारोंच्या संख्येने मुस्लिम समाज बांधव उपस्थित होते. सर्व मुस्लीम बांधवांना मौलाना मुफ्ती अब्दुल आ लीम पठाण यांनी नमाजाचे पठन केले. या पवित्र प्रसंगी त्यांनी विश्वशांती, बंधुता आणि माणुसकीसाठी प्रार्थना केली.



समाजात संवाद वाढावा, प्रेम आणि सेवाभाव बळकट व्हावा, यासाठी मौलाना मुफ्ती अब्दुल आलीम पठाण यांनी नमाज अदा करून अल्लाहकडे प्रार्थना केली. नमाज पठणानंतर ईदच्या शुभेच्छा देण्यासाठी पोलिस निरीक्षक दशरथ चौधरी, भाजपाचे ज्येष्ठ नेते प्रा. मधुकर राळेभात, मुस्लिम पंच कमिटी अध्यक्ष अझरभाई काझी, उपनगराध्यक्ष पोपट राळेभात, माजी नगरसेवक अमित चिंतामणी, प्रा. संजय वराट,मोहन पवार, प्राचार्य विकी घायतडक, शिवसेना शिंदे गटाचे तालुकाध्यक्ष प्रा.कैलास माने, शिवसेना नेते आकाश बाफना, सामाजिक कार्यकर्ते अवधुत पवार, प्रा. लक्ष्मण ढेपे,वंचित बहुजन आघाडीचे राज्य प्रवक्ते अरुण जाधव,भाजप शहराध्यक्ष पवन राळेभात,काँग्रेसचे राहुल उगले, सुरेश जाधव,शिवकुमार डोंगरे, अमोल गिरमे,वसीम सय्यद, संदीप गायकवाड, राजू गोरे ,शहाजी राळेभात, प्रशांत राळेभात, प्रदीप टापरे, शेरखान पठाण, शमा हाजी कादर, एजाज पठाण, वाजीद पठाण, वैजनाथ पोले, प्रा. कैलास हजारे, सुनील जावळे, हरीभाऊ आजबे, शिवकुमार डोंगरे, गफ्फारभाई सय्यद, मंजुरभाई सय्यद, हाबीब मास्टर, उमर कुरेशी, हाजी जावेद सय्यद, वसीम कुरेशी, मुक्तार सय्यद, जमीर सय्यद, ईस्माइल सय्यद, काँग्रेसचे राहुल उगले, वसीम सय्यद, आबेद खान, जुबेर भाई शेख आदी उपस्थित होते.

रमजान महिना संयम,भक्ती आणि परोपकाराचा संदेश देणारा मानला जातो. यानिमित्ताने मुफ्ती अब्दुल आलीम पठाण यांनी जगातील शांततेसाठी आणि भारतातील सामाजिक ऐक्य टिकवण्यासाठी विशेष प्रार्थना केली. त्यांनी सर्वधर्मीयांनी परस्पर सहकार्य आणि सामंजस्याने पुढे जाण्याचे आवाहन करून राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश दिला.

# पेप्सिको इंडियाचा जलसंधारणात मोठा वाटा

*१४८ कोटी लिटर पाणी निसर्गाला परत : 'वॉटर अँड वॉश' उपक्रमातून हजारो ग्रामस्थांना लाभ*




**जलसुरक्षेसाठी सातत्यपूर्ण प्रयत्न**

पेप्सिकोचे उपक्रम पायाभूत सुविधा, तंत्रज्ञान आणि समुदाय सहभाग यांचा संगम साधत जलसंधारणाला चालना देत आहेत. यामुळे स्थानिक जलस्रोतांचे संरक्षण, शेतीला बळकटी आणि लोकांच्या जीवनमानात सुधारणा होत असल्याचे कंपनीने सांगितले.

नवी दिल्ली : (समर्थ गांवकरी)

जागतिक जल दिनानिमित्त पेप्सिको इंडियाने जलसंधारण क्षेत्रातील आपली भक्कम कामगिरी अधोरेखित करत २०२५ मध्ये तब्बल १४८ कोटी लिटर पाणी निसर्गाला परत दिल्याची घोषणा केली आहे.

कंपनीने 'पार्टनरशिप ऑफ प्रोग्रेस' या संकल्पनेतून पाणी संवर्धन, भूजल पुनर्भरण आणि स्वच्छ पाणी उपलब्धतेवर लक्ष केंद्रित केले असून, विविध सामाजिक उपक्रमांद्वारे जलसुरक्षेला चालना दिली आहे.

पेप्सिकोचा 'सस्टेनेबल वॉटर रिसोर्स डेव्हलपमेंट अँड मॅनेजमेंट' (SWRDM) कार्यक्रम पंजाब, महाराष्ट्र (पुणे) आणि उत्तर प्रदेशमध्ये राबवला जात असून, पाणलोट क्षेत्र विकास आणि पावसाचे पाणी साठवण यावर भर दिला जात आहे.

या उपक्रमांमुळे ८९ हजारांहून अधिक ग्रामस्थांना लाभ झाला असून, जलस्रोत उपलब्धता, शाश्वत शेती आणि हवामान बदलांना तोंड देण्यासाठी मदत झाली आहे.

कंपनीने 'सेफ वॉटर ॲक्सेस अँड वॉश' उपक्रमांतर्गत ग्रामीण भागात स्वच्छ पाणी आणि स्वच्छता सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. मथुरामधील यशानंतर हा कार्यक्रम ३० गावांतील १ लाख नागरिकांपर्यंत विस्तारला जाणार आहे. पेप्सिको इंडिया आणि दक्षिण आशियाच्या कॉर्पोरेट अफेअर्स व सस्टेनेबिलिटी प्रमुख यशिका सिंग म्हणाल्या, "आमचा भर पाण्याचा कार्यक्षम वापर, पुनर्वापर आणि वापरलेले पाणी पुन्हा निसर्गाला परत देण्यावर आहे. स्थानिक समुदायांसोबत काम करत आम्ही जलसंधारण अधिक शाश्वत करण्याचा प्रयत्न करत आहोत."

# शंकर धीरडीकर यांची निवड

नांदेड : (समर्थ गांवकरी)

शंकर धिरडीकर हे सुशिक्षीत व माजी प्रशासकीय अधिकारी म्हणून काम केले असून त्यांना शासकीय. शैक्षणिक . सामाजिक . राजकीय.क्षेत्रातील कामाचा अनुभव पाहता त्यांनी आजवर केलेल्या कार्याची दखल घेऊन नॅशनल टेक्नीकल स्टुडंटस आसोशियन NTSA संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष हिटलर भोसले यांच्या आदेशाने महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष भास्कर हंबर्डे यांनी दि १९ मार्च रोजी एका छोटे खानी कार्यक्रमात शंकर धिरडीकर यांची मराठवाडा अध्यक्ष पदी नियुक्ती पत्र देऊन त्यांची निवड करण्यात आली यावेळी व्हाईस ऑफ मिडीया पत्रकार संघाचे नांदेड जिल्हा मुख्य सचिव अनिल पाटील धमने . राम पाटील मरवाळीकर यांच्या प्रमुख उपस्थिती देण्यात आले .

# रिपब्लिकन पक्षाचा कार्यकर्ता मेळावा संपन्न

*रामदास आठवले यांच्या राज्यसभा निवडीबद्दल अभिनंदनाचा ठराव संमत*

पुणे : (समर्थ गांवकरी)

रिपब्लिकन पक्ष (आठवले गट कार्यकर्ता मेळावा मोठ्या उत्साहात संपन्न झाला. यावेळी पुण्यातील नवनिर्वाचित नगरसेवकांचा सत्कार करण्यात आला, तसेच केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांची सलग तिसऱ्यांदा राज्यसभेवर निवड झाल्याबद्दल पक्षाच्या वतीने अभिनंदन ठराव पारित करण्यात आला. या मेळाव्याला शहराध्यक्ष संजय सोनवणे, प्रदेश सचिव बाळासाहेब जानराव, पुण्याचे उपमहापौर परशुराम वाडेकर, नगरसेवक नीलेश आल्हाट, नगरसेविका निशाताई मानवतकर, मोहन जगताप, महिपाल वाघमारे, संतोष आरडे, सुधीर वाघमोडे, माजी नगरसेवक जयदेव रंधवे, अर्जुन आल्हाट, आशिष भोसले, रवी अवसरमल, अक्षय अवसरमल, संतोष खरात, विनोद टोपे, संदीप धांडोरे, अविनाश गायकवाड,




अविनाश कांबळे, अविनाश कदम, दिशा रणदिवे, मीनाज मोमिन, नीलेश रोकडे, यशवंत नडगम, शमसुद्दीन शेख, फिरोज खान, मुशताक शेख, रजाक सयद, अतुल भालेराव, बुद्धिशा रंधवे, उज्वला सर्वगोड,थोरात ताई,आदींसह साडेतीनशेहून अधिक कार्यकर्ते व प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी इतर पक्षांतून रिपब्लिकन पक्षात दाखल झालेल्या कार्यकर्त्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच पक्षवाढीसाठी स्थानिक पातळीवर नव्या पदाधिकाऱ्यांची नियुक्ती करून त्यांना नियुक्तीपत्रे २२ मार्च रोजी केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांच्या हस्ते प्रदान करण्याचे ठरले. दरम्यान, महापालिका निवडणुकीनंतर पुणे शहरातील वाहतूक कोंडी, २४ तास समान पाणीपुरवठा, आरोग्य सुविधा यांसारख्या प्रश्नांवर लक्ष वेधण्यात आले.

# दक्षिणमुखी मारुती मंदिरात त्रिदिनात्मक सोहळा

नेवासा : (समर्थ गांवकरी)

श्री हनुमान जन्मोत्सवाच्या निमित्त तीर्थक्षेत्र नेवासा बुद्रुक येथे श्री समर्थ रामदास स्वामींनी स्थापित केलेल्या जागृत अशा दक्षिणमुखी मारुती मंदिरात त्रिदिनात्मक सोहळयाचे आयोजन मंगळवार दि.३१ मार्च ते दि.२ एप्रिल रोजी या कालावधीत करण्यात आले असल्याचे देवस्थानचे अध्यक्ष गंगाधर शिंदे पाटील यांनी सांगितले. सदर सोहळयात पहाटे ४ ते ६ काकडा भजन,६ ते ७ विष्णूसहस्त्रनाम,सकाळी ७ ते १० ग्रंथराज ज्ञानेश्वरीच्या १८ व्या अध्यायाचे पारायण,सायंकाळी ५ ते ६ महिला भजनी मंडळाचे हरिपाठ,रात्री ७ ते ८ प्रवचन तदनंतर रात्री ८ ते ११ हरिजागर असे दैनंदिन कार्यक्रम



व्यासपीठ चालक हभप कोंडीराम महाराज पेचे यांच्या मार्गदर्शनाखाली साजरे होणार आहे. गुरुवार दि.२ एप्रिल रोजी पहाटे ६ वाजता पुष्पवृष्टी करून श्री हनुमंतरायांचा जन्मोत्सव साजरा होणार असून सकाळी ९ ते ११ यावेळेत पारायण व्यासपीठ प्रमुख हभप कोंडीराम महाराज पेचे यांच्या होणाऱ्या काल्याच्या किर्तनाने त्रिदिनात्मक हनुमान जन्मोत्सव सोहळयाची सांगता होणार आहे.त्रिदिनात्मक सोहळयाच्या निमित्ताने होणाऱ्या धार्मिक कार्यक्रमाचा पंचक्रोशीतील भाविकांनी लाभ घ्यावा असे आवाहन दक्षिणमुखी मारुती मंदिर देवस्थान अध्यक्ष, सचिव व विश्वस्त मंडळांचे सदस्य व नेवासा बुद्रुक ग्रामस्थांनी केले आहे.

# एसजीजीएस संस्थेत "उत्सव-२०२६" सांस्कृतिक महोत्सव जल्लोषात संपन्न

नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)

नांदेड येथील श्री गुरु गोबिंद सिंहजी अभियांत्रिकी व तंत्रशास्त्र संस्थेमध्ये आयोजित "उत्सव-२०२६" हा भव्य सांस्कृतिक महोत्सव अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. दिनांक १३, १४ व १५ मार्च २०२६ दरम्यान पार पडलेल्या या महोत्सवाने संपूर्ण परिसरात सांस्कृतिक उर्जेची लहर निर्माण केली.



तीन दिवस चाललेल्या या महोत्सवात नृत्य, गायन, वाद्यवादन, नाट्यप्रयोग, काव्यवाचन, एकपात्री अभिनय, ललित कला प्रदर्शन, फॅशन शो तसेच विविध सृजनशील व मनोरंजनात्मक स्पर्धांचे आकर्षक आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत आपल्या कलागुणांचे प्रभावी सादरीकरण केले.

महोत्सवाचे प्रमुख आकर्षण ठरलेल्या राज्यस्तरीय अंतर-महाविद्यालयीन सांस्कृतिक स्पर्धेत महाराष्ट्रातील विविध महाविद्यालयातून २०० हून अधिक स्पर्धक सहभागी झाले. नांदेड, परभणी, हिंगोली,लातूर,अमरावती, नागपूर तसेच छत्रपती संभाजीनगर येथील विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहात सहभाग घेतला.

उद्घाटन सोहळ्यास मराठी अभिनेत्री व पार्श्वगायिका आर्या आंबेकर या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. त्यांनी आपल्या सुरेल आवाजाने आणि मनमोहक सादरीकरणाने उपस्थितांची मने जिंकली. समारोप सोहळ्यास प्रसिद्ध पत्रकार व टीव्ही अँकर श्री. विलास बडे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. आपल्या मनोगतात त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत, आजच्या स्पर्धात्मक युगात स्वतःची वेगळी ओळख निर्माण करण्यासाठी कौशल्य विकास, सकारात्मक दृष्टिकोन आणि सतत शिकण्याची वृत्ती आवश्यक असल्याचे सांगितले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे संचालक डॉ.मनेश कोकरे होते. आपल्या मनोगतात त्यांनी सांगितले की, अशा सांस्कृतिक कार्यक्रमांमुळे विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला योग्य दिशा मिळून त्यांच्या आत्मविश्वासात लक्षणीय वाढ होते. शिक्षणाबरोबरच कला,संस्कृती व विविध उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले. विद्यार्थ्यांनी आपल्या अंगी असलेल्या कलागुणांना योग्य वाव देत उपलब्ध संधींचा प्रभावीपणे उपयोग करून घ्यावा, तसेच संघभावना, शिस्त व नेतृत्वगुण जोपासत सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकास साधावा, असे त्यांनी सांगितले. यावेळी अधिष्ठाता प्रा. संजय देठे यांनी 'उत्सव'सारखे महोत्सव विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी उपयुक्त ठरतात, असे नमूद केले. तसेच उत्सव समन्वयक व विद्यार्थी प्रतिनिधींनी घेतलेल्या मेहनतीचे कौतुक करत त्यांनी सर्वांचे अभिनंदन केले.१४ मार्च रोजी पार पडलेल्या राज्यस्तरीय स्पर्धांना प्रचंड प्रतिसाद मिळाला. विविध स्पर्धांतील विजेत्यांना सन्मानचिन्हे, प्रमाणपत्रे व रोख पारितोषिके देऊन गौरविण्यात आले. स्पर्धकांनी उत्कृष्ट सादरीकरण करून परीक्षक व प्रेक्षकांची मने जिंकली.

महोत्सवाच्या यशस्वी आयोजना साठी उत्सव समन्वयक डॉ. दिपक वाघरे तसेच सह-समन्वयक डॉ.प्रणिता बालवे यांनी मोलाची भूमिका बजावली. सुशांत दोहाळे कल्चरल सेक्रेटरी आणि भगवत कमलीकर जनरल सेक्रेटरी यांच्यासह विद्यार्थी प्रतिनिधींनी अथक परिश्रम घेत कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पाडला. या महोत्सवासाठी प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभली. संपूर्ण महोत्सवात उत्साह, आनंद आणि सांस्कृतिक विविधतेचा सुंदर संगम पाहायला मिळाला.

# भेंडीतील प्रतिक रौंदळ यांची दमदार कामगिरी

## भूमी अभिलेख परीक्षेत यशाने गावाचा उंचावला मान




**कळवण : (समर्थ गांवकरी)**

कळवण तालुक्यातील भेंडी या छोट्याशा गावातून एक मोठी प्रेरणादायी यशोगाथा समोर आली आहे. प्रतिक रौंदळ यांनी अत्यंत कठीण समजल्या जाणाऱ्या भूमी अभिलेख (Land Records) परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करून केवळ आपल्या कुटुंबाचाच नव्हे, तर संपूर्ण गावाचा अभिमान उंचावला आहे.

प्रतिक रौंदळ हे कळवण येथील आर.के.एम. विद्यालयाचे प्राचार्य जी.डी. रौंदळ सर यांचे सुपुत्र असून, शिक्षणाची मजबूत पार्श्वभूमी आणि शिस्तबद्ध वातावरण यांचा त्यांना लाभ झाला. मात्र, केवळ पार्श्वभूमी नव्हे तर स्वतःची जिद्द, चिकाटी आणि सातत्यपूर्ण अभ्यासाच्या जोरावर त्यांनी हे यश मिळवले आहे, हे विशेष उल्लेखनीय ठरते.

भूमी अभिलेख परीक्षा ही राज्यातील अत्यंत स्पर्धात्मक आणि कठीण परीक्षांपैकी एक मानली जाते. अनेक विद्यार्थी वारंवार प्रयत्न करूनही अपयशी ठरतात, अशा परिस्थितीत प्रतिक यांनी मिळवलेले यश हे त्यांच्या कष्टाचे आणि आत्मविश्वासाचे जिवंत उदाहरण आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी हे यश म्हणजे "अडचणींवर मात करून मोठे स्वप्न पूर्ण करता येते" याचा ठोस संदेश देणारे ठरले आहे.

प्रतिक यांच्या या यशामागे त्यांच्या कुटुंबीयांचे प्रोत्साहन, मार्गदर्शन आणि सततचा पाठिंबा हा मोलाचा घटक ठरला. यश मिळवताना अनेक अडचणी, ताणतणाव आणि स्पर्धेचा दबाव यांचा सामना करत त्यांनी हार न मानता प्रयत्न सुरू ठेवले, यामुळेच आज ते यशाच्या शिखरावर पोहोचले आहेत.

या यशाबद्दल भेंडी येथे प्रतिक रौंदळ यांचा उत्साहात सत्कार करण्यात आला. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे विलास रौंदळ, सामाजिक कार्यकर्ते गोरख बोरसे, माजी उपसरपंच योगेश रौंदळ, विलास रौंदळ, संदीप वेशी, नंदू बापू रौंदळ, बाबाजी पवार, पप्पू रौंदळ, गुलाब रौंदळ, मनोहर रौंदळ, सुभाष रौंदळ, विकी रौंदळ आदी मान्यवर उपस्थित होते. सर्वांनी प्रतिक यांचे कौतुक करत त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. प्रतिक रौंदळ यांचे यश हे केवळ एक व्यक्तीगत यश नसून, ग्रामीण भागातील प्रत्येक विद्यार्थ्यासाठी आशेचा किरण आहे. योग्य नियोजन, कठोर परिश्रम आणि आत्मविश्वास असेल, तर कोणतीही परीक्षा अशक्य नाही, हे त्यांनी आपल्या कृतीतून दाखवून दिले आहे. आजच्या स्पर्धेच्या युगात, मोबाईल आणि इतर विचलनांपासून दूर राहून अभ्यासावर लक्ष केंद्रित केल्यास यश नक्कीच मिळते, हा संदेश त्यांच्या यशातून स्पष्टपणे दिसून येतो.



ठाणे : दिवा शहराला हक्काचा गणेश विसर्जन घाट व दशक्रिया विधीसाठी घाट मिळावा यासाठी साबेगाव खाडी लगत महाराष्ट्र सागरी महामंडळाची ( Meridian Borad ) परवानगी मिळावी यासाठी खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांची भेट घेऊन त्यांना निवेदन देण्यात आले. यामुळे संपूर्ण दिवा शहराला कसा फायदा होणार असून खासदार शिंदे यांनी चांगली संकल्पना असून दिवा शहरात वाढती लोकवस्ती आणि सार्वजनिक मोठ्या गणेश मूर्तींचे विसर्जन दिवा शहराबाहेर करावे लागते यासाठी दिवा शहरात व्यवस्था करण्याच्या दृष्टीने सकारात्मक आश्वासन दिले. प्रसंगी नगरसेविका अर्चना निलेश पाटील, नगरसेवक बाबाजी पाटील व निलेश पाटील उपस्थित होते.

**(फोटो - संतोष पडवळ )**

## परमपूज्य दरीयालाल जयंती उत्सव चेंबूरमध्ये उत्साहात साजरा; महाप्रसादाचा लाभ!

**चेंबूर : (समर्थ गांवकरी)**



श्री कच्छ वागड लोहणा मंडळाच्या वतीने चेंबूर येथील युटोपिया एन.के.टी. सभागृहात दरवर्षीप्रमाणे यावर्षीही परमपूज्य दरीयालाल जयंती उत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाला समाजबंधू-भगिनींचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

याप्रसंगी संस्थेचे प्रमुख श्री. नानजीभाई खिमजी ठक्कर ठाणावाला यांच्या शुभहस्ते आरती करण्यात आली. कार्यक्रमाला उपप्रमुख श्री. दिनेशभाई दिपचंदभाई कोटक, सचिव श्री. नटवरलाल वीरजीभाई ठक्कर, श्री. राजेशभाई रामाणी, श्री. हरीशभाई मीराणी, श्री. मोहनलाल पुजारा, श्री. दिनेशभाई चंदे, श्री. भरत नाथाणी, श्री. राजेंद्र पुराणी, राजेंद्र पांडे जी, रमेश पुजारा आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी बोलताना नानजीभाई ठक्कर यांनी सांगितले की, कच्छ वागड लोहणा मंडळाच्या वतीने दरीयालाल जयंतीनिमित्त सर्व समाजबांधवांना आमंत्रित करण्यात आले होते. उपस्थित बंधू-भगिनींनी मोठ्या संख्येने सहभाग घेत उत्सवाची शोभा वाढवली. संस्थेद्वारे गरजूंना विविध प्रकारे सहकार्य केले जाते. या सुविधेचा लाभ घेणारी व्यक्ती निर्व्यसनी असणे आवश्यक असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

तसेच सचिव नटवरलाल ठक्कर यांनी उपस्थित मान्यवर व समाजबांधवांचे आभार मानले. कार्यक्रमाच्या शेवटी सर्व उपस्थितांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.

## रमजान ईद उत्साहान साजरा

**तामसा : (समर्थ गांवकरी)**

तामसा येथे मुस्लिम धर्मियांचा सर्वात मोठा सण समजणाऱ्या रमजान ईद निमित्त ईदगाह मैदानात सार्वजनिक नमाज अदा करून रमजान ईद मुबारक बाद करण्यात आलं. हिंदू धर्मियाकडून मुस्लिम बांधवांना गुलाबाचे फुल देऊन ईद मुबारक बाद शुभेच्छा दिल्या ईदगाह मैदानात मुस्लिम बांधवाना ग्रामपंचायत व पोलीस ठाणे तामसा च्या वतीने पुष्प गुच्छ देऊन सामाजिक सलोखा बंधूत्व दर्शय पाहायला मिळाल. या कार्यक्रमात सरपंच आनंद घन्टलवार, ग्रामविकास अधिकारी शंकर आलेवाड, माजी जिल्हा परिषद सदस्य दिलीप बाष्ठेवाड,विजय बास्टेवाड,रमेश घंटळवार, माजी सरपंच बालाजी महाजन, ग्रामपंचायत सदस्य सुभाष धरमुरे, सेवानिवृत्त शिक्षक स. द. कल्याणे, अरविंद कंठाळे, पत्रकार बाळासाहेब खानजोडे,ग्राप सदस्य आकाश जाधव,व्यापारी असोसिएशन चे अध्यक्ष विजय लाभसेठवार, रवी बँडेवार, दिलीप कोथळकर सह पोलीस ठाण्याचे सपोनि शहदेव खेडकर, गुप्तशाखेचे प्रकाश कबळे, शामसुंदर नागरगोजे उपस्थित होते.

## भारत मुक्ती मोर्चा व राष्ट्रीय पिछडा ओबीसी वर्गाचा भव्य मोर्चा




■ २३ एप्रिल २०२६ रोजी बंदची हाक

**ठाणे : (समर्थ गांवकरी)**

भारत मुक्ती मोर्चा व राष्ट्रीय पिछडा ओबीसी वर्ग मोर्चा या सामाजिक संघटनांच्या वतीने दि.२३ मार्च २०२६ रोजी भारतातील सर्व जिल्हाधिकारी कार्यालयावर विशाल मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. ठाणे जिल्ह्यात उल्हासनगर तहसील कार्यालयावर विशाल मोर्चा निघणार आहे. भारत मुक्ती मोर्चा व राष्ट्रीय पिछडा ओबीसी वर्ग मोर्चा या सामाजिक संघटनांकडून ओबीसींची जातीनिहाय जनगणना करणेसाठी केंद्रशासनाने जे नोटिफिकेशन केले त्यात ओबीसी प्रवर्गातील जातींची नोंद होईल असा रकानाच नसल्याने केंद्रशासनाकडून ओबीसींची दिशाभुल, युजीसी कायदा करण्यात आला परंतु सुप्रीम कोर्टात तकलादु युक्तिवाद करण्यात आला. यामुळे एस.सी, एस.टी. व ओबीसी विद्यार्थ्यांवर अन्याय तसेच सन २०११ पुर्वी शिक्षक म्हणुन लागलेल्या सर्व शिक्षकांना शिक्षक पात्रता परिक्षेतुन (TET) या परिक्षेतुन वगळण्यात यावे आदी मागण्यांसाठी ठाणे जिल्ह्यातील उल्हासनगर तहसील कार्यालयावर हा मोर्चा काढण्यात येणार आहे.

सदर मोर्चा उल्हासनगर येथील सुभाष टेकडी येथील डॉ बाबासाहेब आंबेडकर चौक ते गुरू नानक शाळा, नेताजी चौक गांधी रोडमार्गे तहसील कार्यालय येथे समारोप होणार असून ठाणे जिल्ह्यातील सर्व ओबीसी, विद्यार्थी, पालक, शिक्षक व शिक्षकांच्या परिवारातील सर्व बंधु व भगिनींनी उपस्थिती द्यावी असे आवाहन भारत मुक्ती मोर्चाचे ठाणे जिल्हा अध्यक्ष शैलेश सालवे यांनी केले आहे.

## धर्मवीर आनंद दिघे प्रतिष्ठानच्या चैत्र नवरात्रौत्सवात 'आगरी कोळी बाणा' ने भरले रंग



**ठाणे : (समर्थ गांवकरी)**

ठाण्याच्या कोपरीतील संत तुकाराम मैदानात सुरू असलेल्या चैत्र नवरात्रोत्सवात शुक्रवारी लोकपरंपरेच्या रंगांची अनोखी उधळण झाली. धर्मवीर श्री आनंद दिघे प्रतिष्ठानच्या वतीने आणि राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आयोजित चैत्र नवरात्रौत्सवात श्री अंबे मॉ चरणी आगरी-कोळी संस्कृतीचा साज चढला. अविनाश काबाडी, शशांक पाटील आणि पौर्णिमा काकडे यांच्यासह नामवंत कलाकारांनी सादर केलेल्या 'आगरी कोळी बाणा' या बहारदार गीत-संगीत-नृत्य कार्यक्रमाने पारंपरिक ठेक्यावर रसिक भाविकांना थिरकायला भाग पाडले. यावेळी ज्येष्ठ अभिनेत्री वर्षा उसगावकर यांची विशेष उपस्थिती होती. राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या पुढाकाराने धर्मवीर श्री आनंद दिघे प्रतिष्ठानच्यावतीने आयोजित चैत्र नवरात्रौत्सवात शुक्रवारी आगरी-कोळी परंपरेचा सुरेल आणि रंगतदार अविष्कार पाहावयास मिळाला. कोपरीच्या संत तुकाराम मैदानात पार पडलेल्या 'आगरी-कोळी बाणा' या संगीतमय कार्यक्रमाने उपस्थित रसिकांना अक्षरशः मंत्रमुग्ध केले. नामवंत कलाकार अविनाश काबाडी, शशांक पाटील आणि पौर्णिमा काकडे यांनी आगरी-कोळी संस्कृतीची झलक गीत, संगीत आणि नृत्याच्या माध्यमातून सादर केली. नारळी पौर्णिमेपासुन विविध सणासुदीत गाजलेली गाणी तसेच कोळीवाड्यातील २१ दिवसीय गणेशोत्सवाचे गीतातून वर्णन केले. पारंपरिक कोळी गीतांपासून ते १९७०-८० च्या दशकातील " मी डोलकर... यासारख्या लोकप्रिय गीतांच्या सादरीकरणाने वातावरण भारावून गेले. सुशीलकुमार यांनी कार्यक्रमाचे ओघवत्या शैलीत निवेदन करताना सण-उत्सवांचे महत्त्व तसेच साडेतीन शक्तीपीठांचा महिमा रसिकांसमोर प्रभावीपणे उलगडला. एकंदरीत आगरी-कोळी परंपरेच्या सुरावटींनी चैत्र नवरात्रौत्सवात सांस्कृतिक उर्जा आणि आनंदाची उधळण केली. ज्येष्ठ अभिनेत्री वर्षा उसगावकर आणि अभिनेते मंगेश देसाई यांच्या हस्ते देवीची साग्रसंगीत महाआरती करण्यात आली. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, खासदार डॉ. श्रीकांत शिंदे, महापौर शर्मिला पिंपळोलकर, शिवसेना सचिव संजय मोरे, ठामपा अतिरिक्त आयुक्त संदीप माळवी, शिवसेना कल्याण जिल्हाप्रमुख गोपाळ लांडगे, माजी खासदार राष्ट्रवादी काँग्रेसचे मुख्य प्रवक्ते आनंद परांजपे, प्रकाश कोटवानी आदीसह शिवसेनेचे असंख्य पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## कर्मचारी लाच घेताना अटक

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

तहसील कार्यालयात ओळख असल्याचे सांगून काम पूर्ण करून देण्याच्या मोबदल्यात लाच मागणाऱ्या राहुरी नगरपरिषदेच्या कर्मचाऱ्याला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहात अटक केली. बाबासाहेब किशोर राऊत (वय ४०, रा. बुरुडगाव रोड, अहिल्यानगर) असे अटक करण्यात आलेल्या कर्मचाऱ्याचे नाव आहे. तक्रारदाराचे शासकीय 'राष्ट्रीय कुटुंब अर्थसाहाय्य' योजने अंतर्गत ३० हजार मंजूर करून देण्यासाठी राऊत याने १ हजारांची लाच मागितली होती. याबाबत तक्रारदाराने अहिल्यानगर येथील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दाखल केली होती. त्यानुसार पोलिसांनी सापळा रचून राऊत याला लाच स्वीकारताना रंगेहात पकडले. ही कारवाई पोलीस निरीक्षक छाया देवरे यांच्या पथकाने केली.

## टेस्ट ड्राईव्हच्या बहाण्याने वाहन चोरी करणारी टोळी जेलबंद

**डांग गुजरात : (समर्थ गांवकरी)**



डांग जिल्ह्यातील वघई टाउनमधून पिक-अप वाहन चोरीच्या प्रकरणात वाघई पोलिसांनी अवघ्या काही तासांतच दोन सराईत आरोपींना अटक केली आहे. या कारवाईमुळे वाहन चोरी तसेच इलेक्ट्रिक साहित्य चोरीसह अनेक प्रलंबित गुन्ह्यांचा उलगडा झाला आहे. वाघई पोलीस ठाण्यात दिनांक १८/०३/२०२६ रोजी पिक-अप वाहन चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. जिल्हा पोलीस अधीक्षक पूजा यादव यांच्या मार्गदर्शनाखाली पी.आय. व्ही. के. गढवी आणि त्यांच्या पथकाने तांत्रिक तसेच मानवी स्रोतांच्या आधारे तपास सुरू केला. तपासादरम्यान पोलिसांनी महाराष्ट्र-गुजरात सीमेवरून चोरीचे पिक-अप वाहनासह दोन आरोपींना अटक केली. आरोपींची नावे देविदास रामजयाभाई भोये (वय ४२, रा. मोटामाळगाव, ता. सुरगाणा, जि. नाशिक, महाराष्ट्र) आणि मधुभाई रामजयाभाई भोये (वय ३५, रा. जामनविहीर, ता. आहवा, जि. डांग) अशी आहेत.पोलिस चौकशीत आरोपींची कार्यपद्धती (M. O) समोर आली. मुख्य आरोपी देविदास भोये वाहनांच्या शोरूममध्ये जाऊन टेस्ट ड्राईव्हच्या बहाण्याने एजंटांचा विश्वास संपादन करत असे आणि वाहन घेऊन फरार होत असे. तसेच सेकंड हँड वाहन विक्रेत्यांशी संपर्क साधून दिवसा पाहणी (रेकी) करून रात्रीच्या वेळी वाहन चोरी करत असे. गेल्या चार वर्षांपासून तो शेत आणि बागांमधून सबमर्सिबल पंप, स्टार्टर आणि वायरची चोरी करत असल्याची कबुलीही त्याने दिली आहे. पोलिसांनी आरोपींकडून एक पिक-अप वाहन (GJ-२६-U-१८४८) किंमत सुमारे ₹८,००,०००, तीन मोटारसायकली (होंडा शाइन, स्प्लेंडर, युनिकॉर्न) एकूण किंमत ₹१,१८,०००, तसेच एक सबमर्सिबल पंप, तीन इलेक्ट्रिक स्टार्टर आणि ३८२ मीटर वायर (८ बंडल) असा लाखो रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या यशस्वी कारवाईमुळे वघई, आहवा, वांसदा तसेच महाराष्ट्रातील विविध पोलीस ठाण्यांच्या हद्दीत घडलेल्या वाहन चोरी व फसवणुकीच्या अनेक गुन्ह्यांचा उलगडा झाला आहे.

## राज्यात वादळी वाऱ्यासह पावसाचा इशारा

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

राज्यात उन्हाचा कडाका कमी झाला असून हवेत कमी दाबाचा पट्टा निर्माण झाल्याने पावसाला पोषक वातावरण निर्माण झालं आहे. गेले काही दिवस महाराष्ट्रात पावसाने धुमाकूळ घातला आहे. सध्या दक्षिण मराठवाडा आणि पूर्व विदर्भात जोरदार वाऱ्यांसह वादळी पावसाची शक्यता असल्याने हवामान विभागाने येलो अलर्ट देण्यात आला आहे. तसेच पुढील ४ दिवस राज्यात पावसाळी वातावरण कायम राहणार आहे. IMD च्या अंदाजानुसार, शुक्रवारी यवतमाळ येथे राज्यातील उच्चांकी ३८ अंश तापमान नोंदले गेले. जळगाव आणि अकोला येथे ३७ अंशांपेक्षा अधिक तापमानाची नोंद झाली. महाबळेश्वर आणि मालेगाव येथे राज्यातील नीचांकी १५ अंश सेल्सिअस तापमान नोंदले गेले. सध्या मराठवाड्यातील धाराशिव, लातूर, नांदेड आणि विदर्भातील नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली या जिल्ह्यांत राज्यात ताशी ३० ते ४० किलोमीटर वेगाने वाहणारे वारे, मेघगर्जना, विजांसह वादळी वाऱ्यासह पावसाचा अंदाज असल्याने येलो अलर्ट देण्यात आला आहे. या अवकाळी पावसाने शेतकऱ्यांसमोर नवे संकट आणले आहे. बुलढाणा जिल्ह्यातील मोताळा तालुक्यातील पिंपळपाटी येथे वादळी वाऱ्यासह झालेल्या दमदार पावसाने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान केले आहे. विशेषतः मका पिकाला मोठा फटका बसला असून शेतात उभे असलेले पीक आडवे पडल्याने शेतकरी हतबल झाला आहे. आधीच वाढत्या खर्चामुळे अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांवर या अवकाळी पावसाने आणखी संकट ओढवले आहे.

## महालक्ष्मी सरस महिलांसाठी बाजारपेठेचा मोठा ब्रँड : मुख्यमंत्री

**नागपूर : (समर्थ गांवकरी)**

महालक्ष्मी सरस प्रदर्शन हे केवळ विक्रीचे ठिकाण नसून महिला बचत गटांसाठी प्रभावी बाजारपेठ म्हणून कार्य करत आहे. राज्यातील 36 जिल्ह्यात उमेद मॉल उभारण्यात येत असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

या प्रदर्शनाला नागरिकांचा वाढता प्रतिसाद मिळत असून महालक्ष्मी सरस हा प्रदर्शनाचा ब्रँड अधिक मजबूत होत आहे. राज्यात शंभर कोटी रुपयाचा व्यवहार बचत गटाच्या माध्यमातून होत असल्याचेही मुख्यमंत्री यांनी यावेळी सांगितले .या प्रसंगी महसूल मंत्री तथा नागपूर जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, अर्थ व नियोजन राज्यमंत्री आशिष जयस्वाल, आमदार सर्वश्री कृपाल तुमाने, कृष्णा खोपडे, चरणसिंग ठाकूर आदी लोकप्रतिनिधी उपस्थिती होती. महालक्ष्मी सरस 2026 मध्ये सुमारे 404 स्टॉल्स उभारण्यात आले असून आतापर्यंत 10 कोटी रुपयांची विक्री झाली आहे. ही विक्री पुढील काळात मोठया प्रमाणात वाढण्यासाठी शासन प्रयत्नशील राहील, अशी आशा त्यांनी व्यक्त केली.

राज्यात 3 ठिकाणी महालक्ष्मी सरस प्रदर्शन भरविण्यात येते आणि या माध्यमातून सुमारे 100 कोटी रुपयांची उलाढाल होत असते. यामुळे महिलांच्या उद्योगाना मोठी चालना मिळत असून पुढे त्यांना अधिक संधी निर्माण करून देण्याचे काम शासन करणार आहे. ग्रामविकास विभागाच्या माध्यमातून महिला सशक्तीकरणासाठी विविध योजना राबविण्यात येत असून महिला अर्थव्यवस्थेच्या प्रमुख घटक बनल्या आहेत, असेही मुख्यमंत्री म्हणाले. राज्यात 'लखपती दीदी'अभियानांतर्गत 1 कोटी महिलांना सक्षम करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. पहिल्या टप्प्यात 13 जिल्ह्यांमध्ये 'उमेद मॉल' उभारण्यात येणार असून टप्प्याटप्प्याने सर्व 36 जिल्ह्यांमध्ये हे मॉल उभारण्याचा शासनाचा मानस असल्याचे ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी आपल्या मनोगत व्यक्त करताना सांगितले. नागपूर येथे महालक्ष्मी सरस प्रदर्शनाचे आयोजन अत्यंत उत्तम झाले असून यासाठी 100 पैकी 100 गुण आयोजकांना देतो आणि महिलांसाठी महालक्ष्मी सरस च्या माध्यमातून मिळणारी हक्काची बाजारपेठ दरवर्षी नागपुरात उपलब्ध करून दिली जाईल, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

महिलांचे कौशल्य वाढविणे, त्यांच्या उत्पादनांचे ब्रँडिंग व मार्केटिंग करणे आणि त्यातून त्यांची उत्पादने परदेशात पाठविण्यासाठी शासन काम करणार असल्याचेही त्यांनी सांगितले. नवसखी उद्योगिनी योजनेच्या माध्यमातून महिलांना आर्थिक सहाय्य मिळवून देण्याचे काम मंत्री बावनकुळे यांच्या मार्गदर्शनात योजना आखून 1 लाख रुपये महिला बचत समूहाना उपलब्ध करून दिले. आणि त्यातून खऱ्या अर्थाने महिलांना आर्थिक सक्षम करण्याचे काम होत आहे, असे मत राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांनी व्यक्त केले. यावेळी नागपूर जिल्हा परिषदेने राबविलेल्या नाविन्यपूर्ण उपक्रमांचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी दीदी की रसोई उपहारगृह, प्रोजेक्ट ड्रीम 100 विलेज लायब्ररी, 14 आय सी टी लॅब झेड. पी. स्कूल, ए आय लॅब ऑन व्हील- ज्ञानरथ, सुपर 40 अंगणवाडी, गुरुकुल ए आय लॅब 48 अशा नाविन्यपूर्ण उपक्रमांचे लोकार्पण केलेल्या कामांचे त्यांनी कौतुक केले. तसेच भविष्यात जिल्हा परिषदेमार्फत 100 पेक्षा अधिक वाचनालये उभारण्यात येणार असून या उपक्रमाचा देखील शुभारंभ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आला.

सोबतच महालक्ष्मी सरस येथील महिला बचत गटांच्या स्टॉल्सला भेट देत महिलांशी संवाद साधला. त्यांच्या उत्पादनांची विक्री, बाजारपेठेतील प्रतिसाद आणि येणाऱ्या अडचणी जाणून घेतल्या.

तसेच उमेद अभियानाचे मुख्य कार्यकारी अधिकारी निलेश सागर, मनपा आयुक्त तथा जिल्हाधिकारी डॉ. विपिन इटनकर, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी, उमेद अभियानाचे मुख्य परिचलन अधिकारी निखिल ओसवाल, प्रकल्प संचालिका अंशूजा गराटे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी कपिलनाथ कलोडे, सर्व विभाग प्रमुख गटविकास अधिकारी उमेद अभियानाचे जिल्हा व तालुका कक्षातील सर्व अधिकारी कर्मचारी आणि महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. प्रसंगी आभार अतिरिक्त मुख्य कार्यपालन अधिकारी डॉ. कमलकिशोर फुटाणे यांनी मानले, तर सूत्रसंचालन अमोल बाविस्कर यांनी केले.

# युवोन्मेश मैफिलीने रसिकांना मंत्रमुग्ध केले

## युवा कलाकारांच्या सादरीकरणाने रंगले पं. जितेंद्र अभिषेकी संगीत महोत्सवाचे दुसरे सत्र

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

विविध रागांनी नटलेले शास्त्रीय गायन, मन तल्लीन करणारी पखवाज वादनाची जुगलबंदी आणि रसिकांच्या टाळ्या-वाहव्यांच्या गजरात पंडित जितेंद्र अभिषेकी संगीत महोत्सवातील 'युवोन्मेश' ही खास युवा कलाकारांची मैफिल रंगली. तरंगिनी सांस्कृतिक प्रतिष्ठान आणि 'आपला परिसर' यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित २० व्या पंडित जितेंद्र अभिषेकी संगीत महोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी सकाळच्या सत्राची सुरुवात गायिका डॉ. शर्वरी डिग्रजकर-पोफळे यांच्या सुरेल गायनाने झाली. त्यांनी राग गुजरी तोडीमध्ये विलंबित ख्याल आणि द्रुत बंदिश सादर करत रसिकांना मंत्रमुग्ध केले. त्यांच्या सादरीकरणाला गीत




इनामदार, उमेश पुरोहित (तबला) आणि सुकन्या जोशी (तानपुरा) यांनी समर्पक साथ दिली.

यावेळी बोलताना डॉ. शर्वरी डिग्रजकर-पोफळे म्हणाल्या, "या प्रतिष्ठित महोत्सवात सादरीकरणाची संधी मिळणे हे माझे भाग्य असून, हे पंडित जितेंद्र अभिषेकी यांचे आशीर्वादच आहेत."

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ऋषिकेश रामदासी यांनी केले, तर रश्मी अभिषेकी यांनी प्रास्ताविक केले. त्या म्हणाल्या, "अभिजात संगीताचा प्रचार-प्रसार करण्यासाठी पंडित जितेंद्र अभिषेकी यांनी मोठे योगदान दिले आहे. या महोत्सवाच्या माध्यमातून भारतीय शास्त्रीय संगीत तरुणांपर्यंत पोहोचावे, यासाठी 'युवोन्मेश' हा विशेष विभाग सुरू करण्यात आला आहे." या प्रसंगी देवश्री कचरे आणि मंगल गवळी यांच्या हस्ते डॉ. शर्वरी डिग्रजकर-पोफळे यांचा सत्कार करण्यात आला. दुसऱ्या सत्रात पखवाज वादक पार्थ भूमकर आणि प्रथमेश तारळकर यांनी दमदार पखवाज वादन सादर केले. त्यांच्या प्रत्येक थापेसह मैफिल रंगत गेली आणि सभागृहात भक्तीमय वातावरणाची अनुभूती निर्माण झाली. अथर्व कुलकर्णी (संवादिनी) यांनी त्यांना साथ दिली. महोत्सवाच्या शेवटच्या सत्रात आसामच्या गायिका श्रुती बुजरबारूआ यांनी अप्रतिम गायन सादर केले. त्यांनी राग शुद्ध सारंगमध्ये 'धरणी धरोहर' ही रूपक मध्य तालातील बंदिश सादर करत रसिकांची मने जिंकली. त्यांच्या सादरीकरणाला पार्थ ताराबादकर (तबला) आणि सौमित्र क्षीरसागर (संवादिनी) यांनी समर्थ साथ दिली.

यावेळी भावना व्यक्त करत श्रुती बुजरबारूआ म्हणाल्या, "या महोत्सवात सादरीकरणाची संधी मिळणे हे माझे भाग्य आहे. आसामहून महाराष्ट्रात आल्यानंतर मी पंडित विजय कोपरकर यांच्याकडे गायनाचे शिक्षण घेतले. त्यामुळे पुण्यात सादरीकरण करणे म्हणजे माझ्यासाठी माहेरच्या ठिकाणी संगीत सेवा करण्यासारखे आहे." युवा कलाकारांच्या उत्स्फूर्त आणि दर्जेदार सादरीकरणामुळे 'युवोन्मेश' मैफिलीने महोत्सवात विशेष रंग भरला.

# आयडी फ्रेश फूडची ऑर्गेनिक सेगमेंटमध्ये प्रवेश करण्याची घोषणा

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

भारतातील सर्वाधिक पसंतीचा फ्रेश फूड ब्रँड आयडी फ्रेश फूड (iD Fresh Food) ने ऑर्गेनिक सेगमेंटमध्ये प्रवेश करण्याची घोषणा करत आयडी ऑर्गेनिक बॅटर लॉन्च केले आहे. हे लॉन्च आयडी च्या त्या प्रवासातील आणखी एक महत्त्वाचा टप्पा आहे, ज्यामध्ये चव, प्रामाणिकता आणि पारदर्शकतेशी कोणतीही तडजोड न करता क्लीन-लेबल, ताजे आणि विश्वासार्ह दैनंदिन अन्नपदार्थ तयार केले जातात.

आपल्या ऑर्गेनिक बॅटर रेंजसाठी कंपनी एक स्थापित ऑर्गेनिक सोर्सिंग मॉडेलद्वारे कर्नाटक आणि आंध्र प्रदेशमधील २,५०० हून अधिक शेतकऱ्यांकडून धान्य खरेदी करत आहे. या प्रक्रियेत एनजीओ सक्रियपणे




शेतकरी सहभाग आणि स्थानिक पातळीवरील सहाय्य प्रदान करत आहेत. ही सोर्सिंग पद्धत जबाबदार शेतकरी भागीदारी आणि शाश्वत शेती पद्धतींप्रती iD ची दीर्घकालीन बांधिलकी दर्शवते.

लॉन्चबाबत प्रतिक्रिया देताना, आयडी फ्रेश फूड इंडियाचे सीईओ, रजत दिवाकर म्हणाले, "आयडी ऑर्गेनिक च्या पुढील टप्प्याची सुरुवात करताना आम्ही बाजारातील अंतर्दृष्टी लक्षात घेऊन या उत्पादनाची नव्याने मांडणी केली आहे आणि उत्पादनावर अधिक लक्ष केंद्रित केले आहे. आयडी मध्ये दैनंदिन अन्न नेहमीच विश्वास आणि पारदर्शकतेवर आधारित राहिले आहे, आणि ऑर्गेनिक क्षेत्रात प्रवेश करणे ही त्या विश्वासाची नैसर्गिक पुढची पायरी आहे. आयडी ऑर्गेनिक बॅटर द्वारे आम्ही ग्राहकांना प्रमाणित ऑर्गेनिक सोर्सिंगची हमी देत आहोत, तसेच त्यांनी आमच्याकडून अपेक्षित असलेली चव, ताजेपणा आणि सातत्य कायम ठेवत आहोत."

हे उत्पादन पहिल्या टप्प्यात मुंबई, पुणे, बेंगळुरू आणि चेन्नई येथे लॉन्च केले जाईल आणि ऑनलाइन प्लॅटफॉर्म तसेच निवडक मॉडर्न ट्रेड आउटलेट्समध्ये उपलब्ध असेल. दुसऱ्या टप्प्यात ही रेंज हळूहळू इतर शहरांमध्ये आणि वितरण माध्यमांमध्ये विस्तारला जाईल.

# दरोडी येथे दि . २२ पासून पीर शेख बहाऊद्दीन दर्गाचा ऊरुस

**पारनेर: (समर्थ गांवकरी)**

हिंदू - मुस्लिम ऐक्याचे प्रतिक , श्रद्धास्थान व जागृत देवस्थान म्हणून प्रसिद्ध असणाऱ्या दरोडी येथील पीर शेख बहाऊद्दीन चिश्ती रहे . अलैह दर्गाह चा ऊरुस रविवार दि . २२ ते बुधवार दि . २५ असे ४ दिवस चालणार असून यासाठी राज्य व परराज्य भरातून भाविक मोठ्या सहभागी होणार असल्याची माहिती ट्रस्टचे विश्वस्त अन्वर भाई मुजावर यांनी दिली आहे .

पारनेर - अळकुटी रस्त्यावरील रांधे गावापासून ३ किलोमीटर अंतरावर डोंगराच्या कुशीत ३ हजार लोकवस्तीचे असलेले दरोडी गावाच्या पश्चिम बाजूच्या पायथ्याशी असलेली शेख भाऊ बहाउद्दिन चिस्ती रहे यांची दर्गा आहे . ही पौराणिक दर्गा वास्तू ८३१ वर्षांपूर्वीचे असून वर्षातून पीर साहेबांचे दोनदा उरुस उत्सवाचा कार्यक्रम मोठ्या भक्तिभावाने संपन्न केला जातो . पहिला उरूस पीर




साहेबांनी समाधी घेतलेला दिवस म्हणजे उर्दू दशाबान ला असतो , हा ऊरुस फक्त एक दिवसाचा असतो ,तर दुसरा उरूस म्हणजे हिंदू पंचांगाप्रमाणे चैत्र पंचमीला असतो हा उरूस ४ दिवसांचा असतो , रविवार दि २२ ला संदल , सोमवार दि . २३ ला चिराग , मंगळवार दि . २४ ला मोठी यात्रा म्हणजे कंदोरी , या दिवशी सर्वांत मोठी यात्रा असते , तर बुधवार दि २५ ला जीयारत , पानफुल असा भरगच्च यात्रोत्सवाने कार्यक्रम संपन्न होणार आहे . कंदुरी चा मान लोणी मावळा येथील ग्रामस्थांचा असतो , संदलचा मान दरोडी येथील पावडे कुटुंबाचा असतो , तर दिवा लावण्याचा मान शेटे कुटुंबांचा असतो . तर भर यात्रेच्या दिवशी चादर चढवण्याचा मान पारनेर पोलिसांना असतो .

या संपूर्ण दर्गा परिसराची देखभाल पीर शेख बहाउद्दीन चिस्ती रहे . यांचे वंशज मुजावर लोक करतात . त्यांनी ट्रस्टची स्थापना केली असून त्यांतर्गत संपूर्ण नियोजन केले जाते . दरोडी येथील सर्व ग्रामस्थ आपापल्या परीने ट्रस्टला सहकार्य करून यात्रेची शोभा वाढवतात . या ऊरूसाच्या कार्यक्रमाला सर्व धर्मीय भाविक राज्यातील पुणे , मुंबई , नाशिक , संभाजीनगर , अहिल्यानगर , सोलापूर , तर परराज्यातील हैदराबाद , गुजरात , राजस्थान दिल्ली व इतर ठिकाणहून मोठ्या संख्येने हजेरी लावतात.

# बिबट्याच्या हल्ल्यात जखमी

**मंचर : (समर्थ गांवकरी)**

लौकी (ता.आंबेगाव) येथे शनिवार दि.२१ रोजी रात्री राणूबाई मंदिर परिसरात मोटार सायकलवरून जाणाऱ्या एका तरुणावर बिबट्याने हल्ला करून जखमी केले आहे. बिबट्याला जेरबंद करण्यासाठी तीन ते चार ठिकाणी पिंजरे लावावेत, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. लौकी येथे पियुष जनार्दन थोरात (वय २१, रा.लौकी-पाचघरवस्ती) व किरण नवनाथ थोरात (वय २७, रा.लौकी-पाचघरवस्ती) हे मोटार सायकलद्वारे घरी पाचघरवस्ती येथे जात होते.त्यावेळी राणूबाई मंदिर परिसरात बिबट्याने किरण थोरात यांच्यावर झडप घातली. अशाही परिस्थितीत गाडी जोरात पुढे नेल्याने त्यांच्या डाव्या बाजूला पाठीला व हाताला बिबट्याच्या नख्या लागल्या आहेत.

# छावा क्रांतिवीर सेनेचे १२ वे राष्ट्रीय महा अधिवेशन – मुंबई येथे होणार - करण गायकर

**नाशिक : (समर्थ गांवकरी)**

नाशिक येथील ग्रामदैवत कालिका माता मंदिर हॉल येथे छावा क्रांतिवीर सेनेची राज्यस्तरीय अत्यंत महत्त्वपूर्ण बैठक मोठ्या उत्साहात व शिस्तबद्ध वातावरणात संपन्न झाली.या बैठकीत संघटनेच्या आगामी राष्ट्रीय महा अधिवेशनाबाबत सविस्तर चर्चा होऊन मुंबई येथे अधिवेशन आयोजित करण्याचा एकमुखी निर्णय घेण्यात आला.

संस्थापक अध्यक्ष करण पंढरीनाथ गायकर यांच्या नेतृत्वाखाली व प्रदेश कार्यकारिणीतील शिवाजीराजे मोरे,दिनकर मामा कोतकर,अनिल राऊत,नितीन शिंदे,नवनाथ शिंदे,डॉ. किरण डोखे,आशिष हिरे,सुभाष गायकर,गणेश माने,हर्षद भोसले,गिरीश आहेर,गोरख संत,मनोरमा ताई पाटील,संगीताताई सूर्यवंशी,सविताताई वाघ यांच्या प्रमुख उपस्थितीत अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले. यावेळी मार्गदर्शन करताना संस्थापक अध्यक्ष करण गायकर यांनी पुढील एक




महिन्यात राज्यातील सर्व जिल्ह्यांचा दौरा करून संघटन बांधणी अधिक मजबूत करण्यासोबतच अधिवेशनाची जिल्हानिहाय तयारी करण्याचे आवाहन केले.तसेच शेतकरी,सहकार,आरोग्य, शिक्षण,बेरोजगारी व वाढता भ्रष्टाचार या क्षेत्रांतील वंचित घटकांना न्याय मिळवून देण्यासाठी संघटना यापुढे अधिक आक्रमक भूमिका घेणार असून राज्यभर मोठ्या प्रमाणावर आंदोलन उभारण्याचा एकमुखी निर्णय घेण्यात आला.

प्रत्येक आंदोलनात राज्यातील सर्व पदाधिकारी सक्रिय सहभाग नोंदवतील,तसेच प्रत्येक जिल्हाध्यक्षांनी आपल्या जिल्ह्यात तालुका व शहर स्तरावर पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या करून संघटना अधिक सक्षम व बळकट करण्यासाठी प्रयत्न करावेत,अशा स्पष्ट सूचना देण्यात आल्या.

बैठकीदरम्यान राज्यभरातून आलेल्या पदाधिकाऱ्यांनी आपले मनोगत व्यक्त करत संघटना वाढ,अधिवेशनाची तयारी व आगामी आंदोलनाबाबत महत्त्वपूर्ण सूचना मांडल्या. या बैठकीसाठी उपस्थित प्रमुख जिल्हाप्रमुख व पदाधिकारी: नवनाथ वैराळ,अविनाश शिंदे,युवराज घाडगे,दिनेश जाधव,प्रकाश सोळंके,संदीप राऊत,विठ्ठल भुजाडे,सागर जाधव,बालाजी ढगे,गोरख महाराज आहेर,राहुल चाळक,राम पाटील गाडेकर,महादेव कदम,बापू पाटील गोरडे,ज्ञानेश्वर पालखेडे,आबा पाटील,ज्ञानेश्वर कोटकर,दादासाहेब जोगदंड,योगेश पाटील,अविनाश गायकर,प्रितेश पाटील,शुभम महाले,प्रफुल गायकवाड,अलीम शेख,बॉबी निकम,नारायण बाबा जाधव,करण शिंदे,कल्पेश उदावंत,गोकुळ धोंगडे,सखाराम गव्हाणे,आकाश जाधव,दत्ता महाराज पवार,शिवम देशमुख, दत्ता कवडे,अमोल देवरे,महेश हिरे,दत्ता हरळे,मधु शिंदे,तेजस नवले.युवराज डुंबरे,विकास भवर,सौरभ भदाणे,सुदर्शन हिरे, आकाश गायकर,प्रदीप गायकर ज्ञानेश्वर गायकर योगेश राऊत राकेश ठाकरे सुनील पवार राहुल थोरात रोहिदास पवार योगेश शिंदे गणेश वैराग आदींसह शेकडो पदाधिकारी या बैठकीला उपस्थित होते.

# इगतपुरीत भूमाफियांचा सुळसुळाट; नातेवाईकांची जमीन बळकावल्याचा आरोप

**इगतपुरी : (समर्थ गांवकरी)**

नाशिक जिल्हा कायद्याचा बालेकिल्ला म्हणून ओळखला जात असतानाही भूमाफियां विरोधात कारवाई सुरू असताना इगतपुरी तालुक्यातील मौजे दौंडत येथे जमीन बळकावल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. नातेवाईकांच्या अज्ञानाचा फायदा घेत फसवणुकीच्या माध्यमातून जमीन लाटल्याचा आरोप समोर आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, रोहिदास धजू भरीत (रा. शेवगेडांग, ता. इगतपुरी) व त्याचा साथीदार सोमनाथ बोराडे यांनी आपल्या सख्ख्या नातेवाईक (मावशी) यांना विश्वासात घेत गोड बोलून जमीन व्यवहार घडवून आणला. सुरुवातीला केवळ आगाऊ रक्कम देण्यात आली, तर उर्वरित रक्कम धनादेशाद्वारे देण्याचे आश्वासन देण्यात आले. मात्र, दिलेले धनादेश बँकेत वटले नसल्याचे समोर आले आहे. तसेच,





व्यवहारा दरम्यान केवळ १० लाख रुपये रोख देण्यात आले. याशिवाय भारतीय स्टेट बँक, देवळाली कॅम्प शाखेतून सुमारे सव्वा पाच लाख रुपये एका आठवड्यात परत देतो असे सांगून काढून घेण्यात आले; मात्र ही रक्कम आजपर्यंत परत करण्यात आलेली नाही. उर्वरित रक्कमही न दिल्याचा गंभीर आरोप पीडितां कडून करण्यात आला आहे.

दरम्यान, पैसे मागण्यासाठी संबंधित नातेवाईक गेले असता टाळाटाळ करणे, फोन न उचलणे तसेच धमकावण्याचे प्रकार झाल्याचे सांगण्यात आले. काही प्रभावशाली व्यक्तींशी संबंध असल्याचे सांगत दबाव टाकण्याचाही प्रयत्न करण्यात आल्याची माहिती आहे.

या प्रकरणात उषा कुंडलिक कटारे (रा. देवळाली कॅम्प), इंदुबाई यशवंत पंडित (रा. कल्याण) तसेच राजेंद्र, विजय व विनोद आव्हाड (रा. विक्रोळी, मुंबई) यांनी गेल्या तीन वर्षांपासून वारंवार पाठपुरावा करूनही कोणताही प्रतिसाद मिळालेला नाही. दरम्यान, इगतपुरी येथील उपनिबंधक कार्यालयात खरेदीखत नोंदवून व्यवहार पूर्ण झाल्याचे दाखवण्यात आले आहे. मात्र प्रत्यक्षात संपूर्ण रक्कम अदा न करता जमीन हस्तांतरित केल्याचा आरोप होत आहे. स्थानिक पातळीवर रोहिदास भरीत हा आलिशान वाहनांचा वापर करत असून विरोध करणाऱ्यांना आर्थिक प्रलोभन देऊन गप्प बसवण्याचा प्रयत्न करत असल्याची चर्चा आहे. शेवगेडांग (ता. इगतपुरी) येथे त्याच्या बंगल्याचे बांधकाम सुरू असल्याची माहितीही समोर आली आहे. या संपूर्ण प्रकारामुळे नातेवाईकांची मोठ्या प्रमाणावर आर्थिक फसवणूक झाल्याची भावना व्यक्त होत असून संबंधितांविरुद्ध कठोर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी होत आहे.

# वापरल्या जाणाऱ्या वायरची चोरी

**डांग.गुजरात : (समर्थ गांवकरी)**

डांग जिल्ह्यातील आहवा तालुक्यातील धुळचोंड गावात चोरट्यांनी शेतकऱ्यांना लक्ष्य केल्याची घटना समोर आली आहे. नदीकाठावरून शेतापर्यंत सिंचनासाठी टाकण्यात आलेल्या इलेक्ट्रिक वायरची रात्रीच्या वेळी चोरी झाल्याने शेतकऱ्यांमध्ये संताप आणि चिंता व्यक्त होत आहे. धुळचोंड गावातील शेतकरी सीतारामभाई मंगळभाई गावित यांनी आहवा पोलिस ठाण्यात लेखी तक्रार दाखल केली आहे. तक्रारीनुसार, २० मार्च २०२६ च्या रात्री अज्ञात चोरट्यांनी शेतात पाणी उपसण्यासाठी लावलेल्या मोटर कनेक्शनच्या वायरची चोरी केली आहे. ही चोरी केवळ एका शेतातच नव्हे, तर गावातील इतर शेतकऱ्यांच्या शेतातूनही करण्यात आली आहे. सीतारामभाई मंगळभाई गावित, सीतारामभाई लाशुभाई गावित आणि जानुभाई देबीयाभाई गवळी यांच्या शेतातूनही वायर चोरीला गेली आहे.

# पोलीस स्टेशनचे मुख्यमंत्री यांच्या हस्ते उद्धघाटन

**नागपूर : (समर्थ गांवकरी)**

नागपूर शहरातील वाढती लोकसंख्या, शहराच्या बाहेरील भागांमध्ये वेगाने होणारे शहरीकरण तसेच कायदा व सुव्यवस्था अधिक सक्षम करण्याच्या उद्देशाने भांडेवाडी येथील पोलीस स्टेशन सुरु झाले आहे. कायदा व सुव्यवस्था राखण्यास जनतेनी सहकार्य करावे, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांच्या हस्ते आज सुसज्ज अशा भांडेवाडी पोलीस स्टेशनचे उद्धघाटन झाले. त्या प्रसंगी मार्गदर्शन करतांना ते बोलत होते. या प्रसंगी पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, आमदार कृष्णा खोपडे, पोलीस आयुक्त डॉ.रवींद्र कुमार सिंघल, पोलीस उपायुक्त निकेतन कदम तसेच इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. भांडेवाडी पोलीस ठाण्याच्या स्थापनेमुळे परिसरातील नागरिकांना जलद व प्रभावी पोलीस सेवा उपलब्ध



होणार असून गुन्हे प्रतिबंध, कायदा व सुव्यवस्था राखणे तसेच नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण करण्यास मोठी मदत होणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

या पोलीस ठाण्यात अत्याधुनिक सुविधा, तांत्रिक साधने तसेच नागरिकाभिमुख सेवा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. यामुळे पोलीसांची कार्यक्षमता वाढून प्रतिसाद वेळेत देण्यात सुधारणा होणार आहे.

नागपूर पोलीस दल नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी कटिबद्ध असून, नव्याने सुरू करण्यात आलेले भांडेवाडी पोलीस ठाणे हे त्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरणार आहे. प्रारंभी पोलीस आयुक्त डॉ. रवींद्र सिंघल यांनी स्वागत करून पोलीस स्टेशन संदर्भात माहिती दिली.

# नवनियुक्त शिक्षकांनी घेतली प्रदीप वाघ यांची भेट

**पालघर : (समर्थ गांवकरी)**

मोखाडा तालुक्यातील खोडाळा भागातील पेसा भरती अंतर्गत नव्याने रुजू झालेले शिक्षकांचे शिष्टमंडळाने आज आदिवासी समाजासाठी लढा देणाऱे आदिवासी विकास हक्क संघर्ष समिती चे अध्यक्ष प्रदीप वाघ यांची आज सदिच्छा भेट घेतली. या मध्ये श्याम फसाळे, हनुमंत सप्रे, कृष्णा गोलवड, सुरेश शिंदे,हर्षदा खादे, किशोर झडे, अशोक पाटील यांनी सांगितले की,अनेक वर्षांपासून लढा दिल्या नंतर द अखेर न्याय मिळाला असून पेसा भरती मध्ये कायमस्वरूपी नियुक्ती करण्यात आली आहे. शिक्षकांनी समाधान व्यक्त केले.पेसा भरती कर्मचारी लढा मध्ये आदिवासी विकास हक्क संघर्ष समिती चे अध्यक्ष व पंचायत समिती माजी सभापती प्रदीप वाघ यांनी कायम आवाज उठवला होता. मुंबई, नाशिक, पालघर विविध



ठिकाणी झालेल्या आंदोलनात प्रदीप वाघ यांनी सातत्याने सहभाग घेतला होता, तसेच आंदोलनास पाठिंबा दिला होता, मंत्रालय आणि जिल्हा परिषद, जिल्हाधिकारी कार्यालया कडे सातत्याने पाठपुरावा करणारे आदिवासी समाजातील लोकप्रतिनिधी म्हणून प्रदीप वाघ यांचे सर्व नवनियुक्त शिक्षकांनी सदिच्छा भेट घेऊन आभार मानले.या वेळी सर्व शिक्षकांचे वाघ यांनी अभिनंदन केले, तसेच तालुक्यातील शिक्षणाचे ज्ञान दानाचे कार्य अधिक प्रभावीपणे करा अशी अपेक्षा व्यक्त करुन सर्व शिक्षकांना शुभेच्छा दिल्या.

# महायुती सरकार शेतकऱ्यांच्या बाबतीत संवेदनशील : आ. काशिनाथ दाते

## नुकसानग्रस्त भागाची तात्काळ पाहणी व मदतीची हमी

शेतकऱ्यांना आवाहन करतो की, "निसर्गाच्या आपत्तीवर आपले नियंत्रण नसले तरी महायुती सरकार शेतकऱ्यांबाबत संवेदनशील असून यापूर्वीही कर्जमाफी व अतिवृष्टीची मदत दिली आहे. याही वेळी शासन निश्चितच शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे राहील," असा विश्वास आम्हाला आहे.

**- आ. काशिनाथ दाते सर, (विधानसभा सदस्य)**

अवकाळी पाऊस व गारपीटीमुळे ढवळपुरी, ढोकी, धोत्रे, भाळवणी, वडगाव आमली, निघोज आदी गावांमध्ये कांदा, टरबूज, भाजीपाला, फळबागा व चाऱ्याचे मोठे नुकसान झाले आहे. आमदार काशिनाथ दाते सर यांच्या समवेत प्रशासनाने प्रत्यक्ष पाहणी करून परिस्थितीचा आढावा घेतला आहे. उद्यापासून पुढील चार ते पाच दिवसांत सर्व नुकसानग्रस्त भागांचे सविस्तर पंचनामे पूर्ण केले जातील. त्यानंतर संपूर्ण अहवाल राज्य शासनाकडे तात्काळ पाठवण्यात येईल. शेतकऱ्यांना शक्य तितक्या लवकर मदत मिळावी यासाठी प्रशासन कटिबद्ध आहे.

**- गजानन घुले, तालुका कृषी अधिकारी पारनेर**

**पारनेर : (समर्थ गांवकरी)**

पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते सर यांनी ढवळपुरी व परिसरातील वादळी वाऱ्यासह झालेल्या अवकाळी पाऊस व गारपीटीमुळे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या शेतांची प्रत्यक्ष पाहणी करत प्रशासनाला तातडीच्या कार्यवाहीचे निर्देश दिले. तहसीलदार गायत्री सौंदाणे व तालुका कृषी अधिकारी गजानन घुले यांच्या उपस्थितीत त्यांनी शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान प्रत्यक्ष पाहून सबंधित अधिकाऱ्यांना सविस्तर अहवाल जिल्हाधिकाऱ्यांना सादर करण्यास सांगितले. यावेळी बोलताना आमदार दाते सर म्हणाले, ढोकी, धोत्रे, ढवळपुरी, वडगाव आमली, भाळवणी या भागात झालेल्या अचानक गारपीटीमुळे कांदा,



वाटाणा, मका, कलिंगड, मिरची, टोमॅटो आदी पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. शेतकऱ्यांनी लाखो रुपयांचा खर्च करून उभे केलेले पीक ऐन काढणीच्या वेळी नष्ट झाल्याने ते हवालदिल झाले आहेत. "मी स्वतः शेतकरी कुटुंबातील असल्याने या वेदना मला पूर्णपणे समजतात. या संकटकाळात मी तुमच्या पाठीशी ठामपणे उभा आहे," असा दिलासादायक विश्वास त्यांनी शेतकऱ्यांना दिला. घटनेची माहिती त्यांनी तत्काळ जिल्हाधिकारी यांना दिली असून प्रशासनानेही तातडीने हालचाल केली आहे. आज पाहणी करून उद्या अहवाल सादर केला जाणार असून त्यानंतर कृषी सहाय्यक, तलाठी व ग्रामसेवक प्रत्येक शेतकऱ्याच्या शेतात जाऊन स्वतंत्र पंचनामे सुरू करतील. त्यानंतर शासनाकडे अहवाल सादर करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना भरपाई मिळवून देण्यासाठी पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील, उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या माध्यमातून पाठपुरावा केला जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले. या प्रसंगी कृषी अधिकारी मयुरी गोरे, माजी जिल्हा परिषद सदस्य वसंतराव चेडे, सुभाषराव दुधाडे, डॉ. भाऊसाहेब खिल्लारी, उपसरपंच बबनराव पवार, बाबाजी चौधरी, लिंबाशेठ चौधरी, चेअरमन देविदास फलके, सुभाष सासवडे, दीपक भागवत, गोविंद कुटे, संतोष थोरात, सुधाकर गावडे, प्रकाश (नंदू) वाघ, अमोल ठाणगे, भिकाजी वाघ, किरण वाळुंज, भाऊसाहेब चौधरी, अण्णा वाघ, किसन वाघ, संतोष वाघ, भीमाजी देशमुख, निलेश चौधरी, जयसिंग वाघ, सुरेश देशमुख, गणेश विरोळे, बाबासाहेब वाघ, नवनाथ वाघ, वैभव शिंदे, नागेश शेळके, दीपक देशमुख, रामा देशमुख, सि.टी. देशमुख, निंबा देशमुख, प्रदीप वाघ, आबा वाघ, बाळकृष्ण चौधरी, संदीप वाघ, सुभाष शिंदे, उत्तम शिंदे, शिवाजी वाघ, तुळशीराम शिंदे, बाळकृष्ण वाघ, दत्तात्रय वाघ, शरद वाघ, मिनीनाथ शेळके, राजाराम वाघ, लिंबा देशमुख यांसह परिसरातील शेतकरी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.